रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ११८
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १४ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




पुणे : अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेसाठी सोमवारी सुमारे दोन लाख भाविकांनी गर्दी केली होती. सदानंदाचा येळकोट... जयघोष करीत भाविकांनी पिवळ्या धमक भंडाऱ्याची मुक्त उधळण केली. बंदुकीच्या फैरी झाडून सलामी देण्यात आली. ज्वारी वाटून पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# पीएम कुसुम योजनेत महाराष्ट्र अग्रेसर

## शेतकरी हिताच्या बांधिलकीचा प्रत्यय -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

पीएम कुसुम योजनेत देशात पहिले स्थान पटकावून महाराष्ट्राने शेतकरी हिताच्या योजनांच्या अंमलबजावणीतील आपल्या बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला आहे. हे राज्य बळीराजाचे आहे, त्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भावना व्यक्त करून राज्याच्या ऊर्जा विभागाचे कौतुक केले आहे. महाराष्ट्राने सुमारे ७१ हजार ९५८ सौरपंप स्थापित केले आहे.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून या योजनेला यापूर्वीच गती देण्यात आली होती. ऊर्जा विभागाने शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषण विरहित सौर कृषिपंप उपलब्ध करून देण्यासाठी पीएम कुसुम योजना प्रभावीपणे राबविली आहे. या अव्वल स्थानासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांनी ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुढाकारासाठी आणि तसेच महाऊर्जाशी संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचेही अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्री यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे की, राज्यात नवीन व नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्राचाही आपण आपल्या शेतकरी बांधवांच्या कृषीपंपांसाठीही प्रभावीपणे वापर करून घेत आहोत. यामुळे आपल्या बळीराजाला सिंचनासाठी खात्रीलायक असा ऊर्जा पर्याय उपलब्ध होईल. हा पर्याय कमी खर्चाचा आणि विश्वासाचादेखील आहे. ऊर्जा विभागाने केंद्राच्या यंत्रणांशी समन्वय साधून साध्य केलेले उद्दीष्ट हे केवळ एक टप्पा आहे. या योजनेतून अधिकाधिक शेतकऱ्यांना सौर कृषीपंप मिळावेत असे प्रयत्न आहेत. यासाठी महाऊर्जाने आपल्या या कार्यप्रणालीत सातत्य राखावे, तसेच शेतकऱ्यांमध्ये या ऊर्जा स्त्रोताविषयी आणखी जागरुकता निर्माण करावेत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पीएम कुसुम योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाऊर्जामार्फत स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात आले आहे. महावितरणकडे कृषिपंप जोडणीसाठी अर्ज केलेल्या मात्र अनामत रक्कम न भरलेल्या शेतकऱ्यांना आता सौर कृषिपंप देण्याच्या योजनेवरही भर देण्यात येत आहे. महाराष्ट्राने अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण २०२० तयार करून या क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल यापूर्वीच टाकले आहे. राज्याने पुढील पाच वर्षांसाठी पाच लाख कृषिपंपांना मान्यता दिली आहे.

### सर्वांत जास्त सौर कृषिपंप महाराष्ट्रामध्ये

**केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय किसान ऊर्जा सुरक्षा व उत्थान महाभियान कुसुम योजनेत राज्यांना लक्ष ४६ हजार ४७१ सौरपंप बसविण्यासाठी मान्यता दिली आहे. देशात यापैकी एकूण दोन लक्ष ७२ हजार ९१६ सौरपंप स्थापित झाले आहेत. यामध्ये सर्वांत जास्त सौर कृषिपंप महाराष्ट्रामध्ये महाऊर्जामार्फत बसविण्यात आले आहेत.**

# रायगड जिल्ह्यात 'अवकाळी'ने ९७२ हेक्टर भातपिकाचे नुकसान

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रायगड जिल्ह्यात ९७२ हेक्टर क्षेत्रावरील भातपीकाचे नुकसान झाले. नुकसान झालेल्या शेतीचे पंचनाम्याचे काम सुरू आहे.

यंदा भातपिक चांगल्या पद्धतीने बहरल्याने शेतकरी सुखावून गेला होता. ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून भातकापणीला सुरुवात झाली, मात्र अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवले. सलग तीन दिवस एक ते दीड तास पडलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. भाताची उडवी पावसाने भिजू नये यासाठी त्यावर प्लास्टिक कापड टाकण्याचा शेतकऱ्यांनी प्रयत्न केला. अवकाळी पावसामुळे विशेषतः कर्जत,



महाड, पोलादपूर, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, रोहा, खालापूर तालुक्यात शेतांमध्ये पाणी साचले. कापणी केलेल्या भाताची रोपे पाण्यात भिजल्याने भातपीकांचे नुकसान झाले. काही शेतकऱ्यांनी भिजलेली रोपे पुन्हा उन्हात वाळवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याचा फारसा उपयोग झाला नाही.

अलिबाग, पेण, सुधागड या तालुक्यात कमी नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार ९७२ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली. या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत.

**भातशेती नुकसानीचे क्षेत्र**

| तालुका | क्षेत्र |
|---|---|
| कर्जत | ३५० हेक्टर |
| महाड | १८५ हेक्टर |
| पोलादपूर | १४० हेक्टर |
| खालापूर | ७२ हेक्टर |
| माणगांव | ६१ हेक्टर |
| रोहा | ५८ हेक्टर |
| सुधागड | ४८ हेक्टर |
| पेण | ३८ हेक्टर |
| श्रीवर्धन | २० हेक्टर |

# उत्तराखंड येथे बोगद्यात अडकलेल्या ४० कामगारांना वाचविण्याचे काम युद्धपातळीवर



**देहरादून : वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील ब्रह्मखाल-यमुनोत्री राष्ट्रीय महामार्गावर सिलक्यारा ते डंडालगाव दरम्यानच्या बांधकामाधीन बोगद्याचा भाग रविवारी (दि. १२) सकाळी ६ ते ७ वा. च्या दरम्यान कोसळला. त्याखाली ४० कामगार अडकले असून सोमवारीही बचावकार्य युद्धपातळीवर चालू होते. अडकलेल्या कामगारांशी संपर्क झाला असून ते सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्यासाठी पुरवठा पाईपमधून अन्न, पाणी पुरवले जात असून ऑक्सिजनचाही पुरवठा केला जात आहे. बचावकार्य १५ मीटर पोहचले असून अद्याप ३५ मीटरचे काम शिल्लक असल्याची माहिती उत्तरकाशीचे मंडळ अधिकारी प्रशांत कुमार यांनी दिली.

सिलक्यारा ते डंडालगाव दरम्यानच्या बांधकामाधीन बोगद्यात ही दुर्घटना घडली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या जवानांनी शोध आणि बचाव कार्य सुरू केले.

# पीएम किसान योजनेचा हफ्ता उद्या होणार जमा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १५वा हफ्ता बुधवारी (दि. १५) शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे, पण त्याआधी लाभार्थी यादीमध्ये आपले नाव, यासोबतच जर ईकेवायसी केले नसेल तर, ते करणे आवश्यक आहे.

पंतप्रधान किसान सन्मान निधीचा पंधरावा हफ्ता दिवाळीनंतर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याचे सांगितले जात होते. आता दिवाळी संपल्यानंतर शेतकऱ्यांची प्रतीक्षा संपणार आहे. त्यामुळे देशभरातील शेतकरी आपल्या खात्यात पैसे जमा होण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# रोहा भुवनेश्वर येथे सिलिंडरचा स्फोट; तीन जण जखमी

**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

वरसे ग्रामपंचायत हद्दीतील कालवा रस्ता भुवनेश्वर येथील रहिवासी मनोहर घोसाळकर यांच्या घरात सिलिंडरचा स्फोट झाल्याची घटना सोमवारी (दि. १३) घडली. या स्फोटात मनोहर घोसाळकर यांसह अन्य दोघेजण जखमी झाले आहे. सिलिंडर स्फोटाची माहिती समजताच अग्निशमन दल व पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना अधिक उपचारार्थ मुंबईला हलविण्यात आल्याची माहिती रोहा पोलिसांनी दिली.



भुवनेश्वर कालवा रस्ता येथील रहिवासी मनोहर घोसाळकर यांच्या घरात सिलेंडरचा स्फोट झाल्याचे समोर आले. आगीत मनोहर अंबाजी घोसाळकर (वय ६२), त्यांची मुलगी भावना घोसाळकर (वय १७), सायली घोसाळकर (वय २३) हे भाजल्याने त्यांना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी मुंबई येथील एम. जी. हॉस्पिटल येथे अधिक उपचारासाठी नेण्यात आले आहे.

स्फोटानंतर शेजारील नागरिकांनी वेळीच सतर्कता दाखवत आग आटोक्यात आणली. घटनेचा अधिक तपास रोहा पोलीस करीत आहेत. दरम्यान, ऐन दिवाळी सणात दुर्दैवी घटना घडल्याने घोसाळकर कुटुंब अक्षरशः रस्त्यावर आले आहे, तर दानशूर लोकांनी घोसाळकर कुटुंबाला सहकार्य करावे, असे आवाहन रवींद्र कान्हेकर यांनी केले आहे.

## निवडक

### मुंबईची हवा पुन्हा प्रदूषित

**मुंबई** : मुंबईकरांनी जोरदार दिवाळी साजरी केली आहे. लक्ष्मीपूजनाच्या मुंबईत मोठ्या प्रमाणावर फटाके फोडण्यात आले आहेत. त्यामुळे मुंबईतील हवेची गुणवत्ता पातळी २८८वर जाऊन पोहचली आहे. लक्ष्मीपूजनानंतर मुंबईची हवा पुन्हा प्रदूषित झाली आहे. झोपडपट्टीपेक्षा जास्त फटाक्यांची आतिषबाजी उंच इमारतींच्या भागात पहायला मिळाली. त्यामुळे चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

**राम प्रहर**

**बुधवारचा अंक नाही**

दिवाळी पाडव्यानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास मंगळवारी सुटी असल्यामुळे बुधवार (दि. १५)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

-मुख्य संपादक

# पेणच्या वाशी नाका येथे बिबट्याची कातडी जप्त

## वनविभागाची कारवाई; आरोपी फरार



**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील वाशी नाका, पेण येथे असलेल्या म्हात्रेचाळीत वन्य प्राण्यांच्या कातडीची विक्री होणार असल्याची माहिती अलिबाग वनविभागाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने रविवारी (दि. १२) सायंकाळी ५ वाजता सापळा रचून आरोपीचा पाठलाग करीत बिबट्याचे सुकलेले कातडे व एक मोटारसायकल जप्त केली. संशयित आरोपी फरार असून त्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

दुचाकी आणि मौल्यवान बिबट्याचे कातडे वनविभागाच्या सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी गायत्री पाटील आणि नवी मुंबई येथील डब्लूसीसीबी डब्लूआर पथकाचे उपसंचालक योगेश वरकड, अलिबाग उपवनसंरक्षक राहुल पाटील अलिबाग वनविभागाच्या सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी गायत्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आलेल्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली असून फरार आरोपीचा शोध वनविभागाने सुरू केला आहे.

या कारवाईत पेण वनविभागाचे वनपाल वनरक्षक तसेच अलिबाग येथील फिरते पथक यांचे सहकार्य लाभले. वेगवेगळ्या पथकाने सापळा रचून प्रतिबंध केला होता, मात्र सुगावा लागताच आरोपीने पलायन केले.

> **वन्यप्राण्यांची शिकार करणे हा गुन्हा आहे. या गुन्ह्यातील आरोपींना तीन ते सात वर्षांची सक्षम कारावासाची शिक्षा होते. नागरिकांनी अंधश्रद्धा व आमिषांना बळी न पडता प्राण्यांच्या कातड्याची तस्करी करणाऱ्यांची माहिती वनविभागाला द्यावी. संबंधीत व्यक्तींचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. वन्यप्राण्यांची तस्करीसह कातडी विक्री करणाऱ्या आरोपींचा शोध वनविभागाकडून सुरू केला आहे.**
> **-गायत्री पाटील, सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी, अलिबाग**

# सलमान खानच्या फॅन्सनी चित्रपटगृहातच फटाके फोडले



**मालेगाव :** दिवाळीची सर्वत्र धामधूम सुरू असताना लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सलमान खानच्या चाहत्यांनी येथील मोहन चित्रपटगृहात थेट फटाक्यांची आतषबाजी करीत गोंधळ घातला.

जवळपास १० मिनिटे फटाके उडवले गेले. यामुळे चित्रपट मध्येच बंद करावा लागला. रविवारी रात्री मोहन चित्रपटगृहात सलमान खानच्या टायगर तीन या चित्रपटाचा खेळ होता. चित्रपट सुरू झाल्यानंतर काही चाहत्यांनी फटाके फोडण्यास सुरुवात केली. यामुळे अन्य प्रेक्षकांची धांदल उडाली. यात कोणीही जखमी झाले नाही.




# खारघरमध्ये एक दिवा एकतेचा!

## मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती





(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एक दिवा एकतेचा या संघटनेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार युवकांमध्ये पोहचवण्याचे तसेच महाराजांना अभिप्रेत असलेले कार्य संघटनेच्या माध्यमातून होत असल्याचे गौरवोद्गार राज्याचे कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी रविवारी (दि. १२) खारघर येथे केले, तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनीही या कार्यक्रमाला भेट देऊन दीपोत्सव साजरा केला.

एक दिवा एकतेचा ही संघटना गेल्या तीन वर्षांपासून खारघर येथे दीपोत्सव साजरा करीत आहे. या उत्सवाच्या पहिल्या वर्षी १५ हजार दिव्यांनी अयोध्या येथील राम मंदिराची प्रतिकृती तर दुसऱ्या वर्षी आझादी का अमृत महोत्सव संकल्पना घेऊन ७५ हजार दिव्यांनी अखंड भारताची प्रतिकृती तयार केली. या वर्षी ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा वर्ष संकल्पना घेऊन एक लाख दिवे लावून हा दीपोत्सव खारघर सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानात साजरा करण्यात आला.

या उत्सावामध्ये एक हजार घरातून तेल, दिवे आणि वाती जमा करण्यात आल्या असून या उत्सवाला नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड चिटणीस बिजेश पटेल, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अदित्य कांबळे, उपाध्यक्ष कुणाल महाडीक, श्रीराम शिंदे, मोना आडवाणी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# एमएमआरमधील २७ उड्डाणपुलांची तपासणी

## एमएसआरडीसीचा निर्णय, आयआयटीकडे काम

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत बांधलेल्या २७ उड्डाणपुलांची संरचनात्मक तपासणी (स्ट्रक्चरल ऑडिट) आयआयटीमार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामाला पुढील महिन्यात सुरुवात करण्याचा एमएसआरडीसीचा मानस आहे. याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी एमएसआरडीसीने १९९६मध्ये ५५ उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार यापैकी २७ उड्डाणपूल, चार भुयारी मार्ग, एक रेल्वे ओव्हर ब्रिज, एक खाडीपूल, चार जंक्शन असे एकूण ३७ पूल बांधण्यात आले. हे सर्व पूल, भुयारी मार्ग सध्या चांगल्या स्थितीत असून त्यांची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्यात येणार आहे, एमएसआरडीसीचे म्हणणे आहे.



पुलाची भार क्षमता, बेअरिंगची स्थिती, पुलाची मजबुती तपासण्यासह पुलाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे का हे निश्चित करण्याच्या उद्देशाने ही संरचनात्मक तपासणी करण्यात येणार असल्याचेही एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्याने सांगितले. या कामासाठी खर्च, केव्हा सुरुवात करायची, तसेच काम कधीपर्यंत पूर्ण करायचे याची निश्चिती लवकरच करण्यात येणार आहे.

### तपाणीसाठी प्राधान्य देण्यात येणारे २७ उड्डाण पूल

सीएसटी उड्डाणपूल–चेंबूर, छेडानगर पूल–चेंबूर, अंधेरी घाटकोपर लिंक रोड पूल–चेंबूर, विक्रोळी पूल–विक्रोळी, जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड पूल–कांजूरमार्ग, गोरेगाव–मुलुंड लिंक रोड पूल–मुलुंड, नितीन कास्टिंग पूल–ठाणे, गोल्डन डाईज पूल–ठाणे, कलिना वाकोला पूल–सांताक्रुझ, जयकोच पूल –जोगेश्वरी, आरे कॉलनी पूल–गोरेगाव, फिल्मसिटी पूल–गोरेगाव, राणीसती मार्ग पूल–मालाड, दत्तपाडा पूल–बोरिवली, नॅशनल पार्क पूल–बोरिवली, गांधीनगर (एलबीएस) पूल–कांजूरमार्ग, सायन उड्डाणपूल–शीव, लार्सन अँण्ड टुब्रो पूल–पवई, बीएआरसी जंक्शन पूल–अनुशक्ती नगर, मानखुर्द पूल–मानखुर्द, वाशी पूल–वाशी, नेरुळ पूल– नेरुळ, सीबीडी बेलापूर पूल–सीबीडी बेलापूर, खारघर पूल–खारघर, तळोजा पुल–तळोजा, मानखुर्द भुयारी मार्ग पूल–मानखुर्द, कुतुब–ए–कोकण–मुखदुम–अली माहीम पूल–माहीम आणि लव्ह ग्रो पूल.

# प्रदूषणबाबत समाज प्रबोधन करणे काळाची गरज –माजी मंत्री जगन्नाथ पाटील

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रदूषित हवेत श्वसन केल्याने, माणसाच्या मेंदूतील जडणघडणीवर विपरीत परिणाम होतो. या बाबत समाज प्रबोधन करण्याची गरज असून जागरूक नागरिकांनी पुढाकार घेऊन जनजागृती मोहीम राबविण्याची वेळ आली असल्याचे मत माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी रविवारी (दि. १२) वाशी येथे आयोजित एका सन्मान सोहळ्याप्रसंगी व्यक्त केले.

यमुनाई फाउंडेशन आणि संस्कार वाचनालय नवी मुंबई यांच्या वतीने वाशीतील गुरव ज्ञाती समाज सभागृहात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. त्या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भाजपचे माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी आपले मत व्यक्त केले. या वेळी नाशिक येथील गायक रघुवीर थत्ते, ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, नाट्यकर्मी विलास गुर्जर, आगरी समाजाचे नेते जयेंद्र खुणे, सामाजिक कार्यकर्ते अनिल भगत, संस्थेचे संस्थापक तथा आयोजक मोहन भोईर, हिंदी गझलकार इक्बाल कवारे, कार्याध्यक्ष प्रा. चंद्रकांत मढवी आदी उपस्थित होते. कोमसापचे नवी मुंबई पदाधिकारी मोहन भोईर यांच्या 'जुळी मुंबई' या दिवाळी अंकाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या वेळी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या राज्यातील निवडक १३ जणांना राज्यस्तरीय मातृवंदन पुरस्कार देण्यात आले. कल्पना देशमुख, मीनल माळी, प्रतिभा पाटील, ॲड. तृप्ती पाटील, नवी मुंबई महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे, कवी संदेश भोईर, लीला राठोड, अनंत पाटील, संतोष जाधव, राजाराम भगत, संजय म्हात्रे, संदीप पाटील, ॲड. मनोज म्हात्रे, शांताराम लोखंडे आणि श्यामसुंदर गावकर यांना सन्मानचिन्ह तसेच प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



# नवी मुंबईत मलावी देशातून आंबे दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



दिवाळीच्या फराळ सोबत आंबे? आश्चर्य वाटेल पण हे शक्य आहे. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर यंदा पहिल्यांदाच एपीएमसी फळ बाजारात आंब्याची आवक झाली आहे. मौसमतील पहिला आंबा आल्यावर त्याची विधीवत पूजा व्यापारी करतात, मात्र यंदा भारतीय मौसम पूर्व आंबा आल्याने व्यापाऱ्यांनी त्याची पूजा केली.

आफ्रिका खंडातील मलावी देशातून आंब्याच्या ५५० पेट्या आवक झाली असून या आंब्याला चार ते पाच हजार रुपये प्रतिपेटी दर मिळाला आहे. ऐन दिवाळीत आंबे खवय्यांणा आंब्याची चव चाखायला मिळणार असून अवघ्या १० मिनिटांत या सर्व आंब्यांची विक्रीदेखील झाली आहे.

हापूस आंब्याप्रमाणेच या आंब्याची चव आहे. सध्या ५५० पेट्या आल्या आहेत. ही आवक नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून वाढणार आहे.

मलावीचा आंबा मौसम डिसेंबरपर्यंत असणार आहे तर डिसेंबरनंतर भारतीय आंबा बाजारात येणे सुरू होईल, अशी माहिती व्यापारी संजय पानसरे यांनी दिली.

# माजी मुख्यमंत्री वसंत पाटील यांना अभिवादन

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री व सहकार महर्षी वसंत पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज विधान भवन परिसरातील त्यांच्या पुतळ्यास विधानमंडळ सचिवालयाचे अवर सचिव विजय कोमटवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी विधानमंडळ सचिवालयाचे अवर सचिव (समिती) सुरेश मोगल, संचालक, वि. स. पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, सामाजिक कार्यकर्ते यशवंत हाप्पे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही दिवंगत वसंतदादा पाटील यांच्या पुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# मुंबईतील पोलीस अधिकाऱ्यालाच सायबर गुन्हेगारांकडून ऑनलाईन गंडा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई पोलीस दलातील अधिकाऱ्याचीच ऑनलाईन सायबर फसवणूक झाल्याचा प्रकार उघड झाला आहे. या अधिकाऱ्याची ४.४९ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर असलेले अधिकारी मलबार पोलीस ठाण्यात तैनात आहेत. गेल्या आठवड्यात ११ नोव्हेंबरला त्यांना डेबिट कार्ड मिळाले. त्यानंतर त्यांना अनोळखी क्रमांकावरून मोबाईल आला. मी तुमच्या बँकेतून बोलत आहे, तुमचे डेबिट कार्ड आले आहे. या कार्डचे पिन सेटअप करून देण्यासाठी फोन केला आहे. त्यानंतर आरोपीच्या मोबाईल क्रमांकावर त्याने एक फाईल पाठवली. त्यांनी त्या फाईलवर क्लिक केले. त्यानंतर फोन करणाऱ्या व्यक्तीने त्यांना सर्व वैयक्तिक माहिती भरण्यास सांगितली. पॅनकार्ड क्रमांक, डेबिट कार्ड क्रमांक व कार्ड संपण्याची तारीख टाकायला सांगितले.

त्यानंतर या पोलीस अधिकाऱ्याच्या मोबाईलवर अनेक मेसेज आले. त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. फोन करणाऱ्या व्यक्तीने त्यांच्या दुसऱ्या खात्याची माहिती मागितली. तेव्हा पोलीस अधिकाऱ्याला संशय आला, बँक खात्याची माहिती काय करायची आहे, असा प्रश्न मी त्याला पोलीस अधिकाऱ्याने असता त्याने कॉल बंद केला.

तोपर्यंत पोलीस अधिकाऱ्याच्या खात्यातून १.९७ लाख, १९५० रुपये, ५७ हजार असे एकूण ४.४९ पोलीस अधिकाऱ्याच्या खात्यातून गेल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलीस अधिकाऱ्याने तत्काळ सायबर क्राईम पोर्टलवर व काळा चौकी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

# सिद्धेश्वर खुर्द येथील आदिवासींना साहित्य भेट



**पाली : प्रतिनिधी**

गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांच्यावतीने सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर खुर्द आदिवासी वाडी व रेळाचीवाडी येथील ६० कुटुंबांना दिवाळी सणानिमित्त साहित्य भेट देऊन त्यांची दिवाळी गोड करण्यात आली.


या साहित्यामध्ये ६० ब्लँकेट, ३० नऊवारी साड्या, ४० सहावारी साड्या, प्रत्येकी टॉवेल, मिठाई बॉक्स यांचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेतील ५० विद्यार्थ्यांना रजिस्टर, चित्रकला वह्या, कलर बॉक्स, पाटी–पेन्सिल अशा प्रकारचे साहित्य वाटप करण्यात आले. साहित्य वाटप झाल्यानंतर सर्व आदिवासी बांधवांनी गोरख पाटील मित्रपरिवार मुंब्रा यांचे मनःपूर्वक आभार मानले.

या कार्यक्रमानिमित्त गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांचे संस्थापक गोरख पाटील, सचिन पाटील, आयुब शेख, मयूर सारंग, मयूर पाटील, शंकर विश्वकर्मा, इरफान भाई आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता शिक्षक उल्हास केदारी यांनी प्रयत्न केले तसेच शिक्षक पांडुरंग पारधी यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक दंत व आभार भगवान साजेकर यांनी मानले.

# आगरी दर्पण दीपावली अंकाचे प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

आगरी दर्पण दीपावली २०२३ अंकाचे प्रकाशन शनिवारी (दि. ११) पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई डॉ. रवींद्र शिसवे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संपादक दीपक म्हात्रे, कार्यकारी संपादक जे. डी. तांडेल, प्रकाशक जयवंत तांडेल, सहव्यवस्थापक डी. बी. पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.




या दिवाळी अंकात किरण येले, स्मिता वाजेकर, ए. डी. पाटील, प्रदीप निफाडकर यांच्या भावस्पर्शी कथा, आगरी समाजातील पहिले आयपीएस अधिकारी व सद्द्याचे पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई, यांनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत गुंफलेले वैचारिक पुष्प या अंकात सविस्तर दिले आहे, ते इतरांना मार्गदर्शक ठरेल असे आहे. शिवाय अनंत शिसवे, गिरीधर पिंगळे, उल्का महाजन, किरण मोघे, उदय निरगुडकर, अच्युत गोडबोले, प्रा. नंदकुमार गोरे, डॉ. दीपक शिकारपुर, प्रा. अशोक ढगे, मुक्ता पुणतांबेकर, धनंजय गोंधळी, ज्येष्ठ पत्रकार भागा वरखडे, माधव भांडारी, प्रा. मुक्ता पुरंदरे, आबा माळकर, ज्येष्ठ पत्रकार वासुदेव कुलकर्णी, सचिन सावंत, प्रा. भानुदास बेरड, किशोर पाठक, राधिका खाडिलकर, गौरी कानिटकर, शैला गाढे आदींचे अभ्यासपूर्ण लेख याशिवाय हरिश्चंद्र दळवी, नवनाथ ठाकूर, जयंत पाटील, प. सा. म्हात्रे, रामदास खरे, विजय गायकर यांच्या भावस्पर्शी कविता, असा सकस साहित्याने नटलेला आहे.



# शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रेंची ट्री हाऊस स्कूलला सदिच्छा भेट



**पेण : प्रतिनिधी**

युवा नेते वैकुंठ पाटील संचालक असलेल्या व शर्मिला पाटील संचलित ट्री हाऊस स्कूलला शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी सदिच्छा भेट दिली.

या वेळी त्यांनी शाळेची पाहणी केली असता सुंदर व गुणवत्तायुक्त मांडणी पाहून त्यांनी समाधान व्यक्त करीत ट्री स्कुल नावारूपाला येऊन या छोट्याशा रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर होवो अशा शुभेच्छा दिल्या. या वेळी वैकुंठ पाटील, ट्री हाऊस स्कूलच्या संचालिका शर्मिला पाटील यांच्यासह शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व नागरिकांना दीपावलीनिमित्ताने त्यांनी शुभेच्छा दिल्या. पेणमधील शिक्षण पद्धतीबाबत लवकरच आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी ट्री हाऊस स्कूलच्या मुख्याध्यापिका कर्मचाऱ्यांनी त्यांना निवेदन दिले.

# 'शासनाच्या योजनांचा अधिक लाभ घ्यावा'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


(छाया : योगेश पाटील)

राज्यातील सरकार हे सर्वसामान्यांचे सरकार आहे त्यामुळे सर्वांनी शासनाच्या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी आनंदाचा शिधा वाटपावेळी केले तसेच सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

दिवाळीत सामान्य, गोरगरीब कुटुंबांना आनंदाचा शिधा पुरवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याने अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. सर्वसामान्य, गोरगरिबांचे सण हे आनंदात जावे यासाठी राज्य सरकारने मागील वर्षीपासून आनंदाचा शिधा वाटण्याचा निर्णय घेतला. उत्सव काळात गोडधोड पदार्थ करण्यासाठी लागणारे जिन्नस अवघ्या १०० रूपयांत देण्याची ही योजना आहे. यामध्ये एक किलो साखर, एक लीटर पामतेल तर पोहा, मैदा, रवा आणि चणाडाळ हे जिन्नसाचा समावेश आहे.

या आनंदाचा शिधाचे पनवेलमधील संघमित्र महिला बचत गटाच्या रास्त भाव धान्य दुकानात भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. १३) वाटप करण्यात आले.

या वेळी महपालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत, भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, माजी नगरसेवक अजय बहिरा, शिवसेना तालुका प्रमुख भरत जाधव, अशोक आंबेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

# 'राज्य कला प्रदर्शनासाठी कलाकृती पाठवा'

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या २० ते ३० नोव्हेंबर या कालावधीत जहांगीर आर्ट गॅलरी येथे होणाऱ्या प्रदर्शनासाठी राज्यातील कलाकारांकडून ऑनलाईन पद्धतीने कलाकृती मागविण्यात येत असल्याची माहिती प्रभारी कला संचालक राजीव मिश्रा यांनी दिली आहे.

कला संचालनालयाच्या www.doa.maharashtra या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात कलाकृती सादर करण्याचे आवाहन प्रभारी कला संचालक राजीव मिश्रा यांनी केले आहे. प्रदर्शनातील पारितोषिकपात्र कलाकृतींना प्रत्येकी ५० हजार याप्रमाणे एकूण १५ पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहे.

# संविधान दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा

## विजेत्यांना भरघोस रक्कमेची बक्षिसे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संविधान दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच पुरस्कृत सधम्म सामाजिक संस्था आणि विवेक विचार मंच पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषेमध्ये ही स्पर्धा होणार आहे.

इयत्ता पाचवी ते सातवी आणि इयत्ता आठवी ते बारावी या दोन गटासाठी माझे संविधान तर वय ३० वर्षांखालील गटासाठी आपले संविधान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, देशापुढील आव्हाने आणि भारतीय संविधानाचे महत्त्व, भारतीय संविधान अधिकार आणि कर्तव्य व अमृत काळातील भारत आणि संविधानाचे योगदान या विषयावर स्पर्धा होणार आहे.

इयत्ता पाचवी ते सातवी गटातील प्रथम क्रमांकास पाच हजार रुपये, द्वितीय तीन हजार रुपये, तृतीय दोन हजार, तसेच दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी ५०० रुपये; इयत्ता आठवी ते बारावी गटातील प्रथम आठ हजार रुपये, द्वितीय पाच हजार रुपये, तृतीय तीन हजार रुपये, तसेच दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी एक हजार रुपये; वय ३० वर्षाखालील गटातील प्रथम १० हजार रुपये, द्वितीय सात हजार रुपये, तृतीय पाच हजार रुपये, तसेच दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी दोन हजार रुपये, तसेच सर्व गटातील विजेत्यांना चषक आणि सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धा पनवेल तालुका क्षेत्रापुरता मर्यादित असून स्पर्धकाने आपला पाच मिनिटांचा व्हिडीओ रेकॉर्ड करून savidhandingmail.com या ई–मेल आयडीवर, (७२०८९४७८४५, ९५९४००२५४८) या व्हॉट्सॲप क्रमांकावर २० नोव्हेंबरपर्यंत पाठवावा. सर्व स्पर्धकांनी स्पर्धेचा फॉर्म भरणे गरजेचे असून नावनोंदणी व अधिक माहितीसाठी सुभाष कांबळे (९५९४००२५४८), अशोक तिडके (९५९५२७२७८४) किंवा संजय जाधव (९८९२५५३१८४) यांच्याशी संपर्क साधावा.

# भाजपतर्फे दिवाळीनिमित्त फराळ वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वत्र दिवाळी साजरी होत असताना समाजातील निराधार, गरीब कुटुंब मात्र या आनंदापासून दूर असतात. या वंचित घटकातील व्यक्तींनाही दिवाळीचा आनंद घेता यावा आणि त्यांचीही दिवाळी गोड व्हावी यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने पनवेल तालुक्यातील तामसाई आणि खैरवाडी येथील बोंडरपाडा येथे दिवाळीनिमित्त फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते फराळाचे वाटप करण्यात आले. या वेळी भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, राजेश भगत, रेवन पाटील, पांडू वाघ, सुनील पाटील, राजेश भोईर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



(छाया : संकेत भोईर)







**पनवेल : दिवाळीनिमित्त कोन आदिवासी वाडी येथे भाजप काळुंद्रे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांच्या वतीने साडी व फराळ वाटप करण्यात आले. या वेळी राहूल घरत, राम म्हात्रे, उदय म्हात्रे, संतोष गाताडे, ज्ञानेश्वर आदी उपस्थित होते.**

# कर्ज देतो सांगून गंडा

## कळंबोलीत एकाचे ९० हजार उकळले

**पनवेल : वार्ताहर**

कर्ज मंजूर करण्यासाठी तब्बल ९० हजार रुपये उकळण्याचा प्रकार कळंबोलीमध्ये उघडकीस आला. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कळंबोली सेक्टर ३ ई,येथील गणेश गोपाळ राई यांना मुलीच्या बी फार्म प्रवेशासाठी एक लाख ७५ हजार रुपये शुल्क भरायचे होते. त्यासाठी काही रक्कम कर्जाद्वारे भरण्याचा त्यांनी निर्णय घेतला होता. यादरम्यान, फेसबुकवर त्यांना धनी फायनान्स नावाच्या ॲप्लिकेशनची माहिती मिळाली. दोन तासांत कर्ज मिळेल, अशी जाहिरात असल्याने त्यांनी हे ॲप्लिकेशन डाऊनलोड करून त्यात स्वतःची माहिती भरली. त्यानंतर त्यांना धनी फायनान्समधून कॉल आला व सेवाशुल्क चार्ज म्हणून १५ हजार ५० रुपये भरण्यास सांगितले. ते पैसे त्यांनी गुगल पेवर भरले. त्या वेळी इन्शुरन्स चार्जेस सात हजार ४८६ रुपये भरण्यास सांगितले. त्यांनी मुलीच्या बँक खात्यावरून ते पैसेही भरले. पुन्हा जीएसटी रक्कम १२ हजार ६३० रुपये भरली. त्यानंतर एनओसी चार्जेस १४ हजार ९६०, आरबीआय चार्जेस २२ हजार ७७८, दोन आगाऊ हप्ते १७ हजार १०० असे एकूण ९० हजार चार रुपये त्यांनी भरले. त्यानंतर आगाऊ म्हणून १७ हजार ३० भरायचे होते, तुम्ही १७ हजार १०० भरल्याने सिस्टीम घेत नाही, त्यामुळे १७ हजार ३० रुपये भरा, असे समोरच्या व्यक्तीकडून सांगण्यात आले. त्या वेळी पैसे नसल्याने भरलेले पैसे परत करण्यात सांगितले असता, रिफंडसाठी सात हजार २५० रुपये भरण्यास सांगण्यात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी तक्रार दाखल केली.

# पनवेल युवा दिवाळी अंकाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संपादक निलेश सोनावणे हे आपल्या वर्तमान पत्राच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्न मांडत असतात आणि ते तडीस नेतात. दिवाळी अंकामध्ये दर्जेदार साहित्य आणि नियमित प्रकाशित होणाऱ्या दर्जेदार बातम्या हीच पनवेल युवाची ओळख आहे असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल युवाच्या सोळाव्या दिवाळी अंकाच्या प्रकाशनावेळी केले.

निलेश सोनावणे संपादित पनवेल युवा दिवाळी अंकाचे प्रकाशन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते गौतम पाटेकर, पत्रकार रविन्द्र गायकवाड, पत्रकार अनिल कुरघोडे, पत्रकार शंकर वायदंडे, पत्रकार संतोष वाव्हल, पत्रकार राजेंद्र कांबळे, पत्रकार रवींद्र चौधरी, प्रशांत आवळे, उद्योजक मच्छिंद्र जाधव, रा. जी. प. सदस्य अमित जाधव, जागृती फाऊंडेशन संदेश पाटील, कल्पेश कांबळे आदी उपस्थित होते.



# प्रदूषण विरहित व फटाके मुक्त दिवाळी

## पनवेल महापालिकेतर्फे जनजागृती कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका आयोजित माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्रदूषण विरहित व फटाके मुक्त दिवाळी ह्या विषयावर रविवारी (दि. १२) सकाळी देवाळे तलावाजवळील गांधी उद्यानामध्ये जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी पनवेल सायकलिंग क्लबचे समुारे १००-१२० सदस्य उपस्थित होते. तसेच नागरिक उपस्थित होते.



पनवेल महापालिकेच्यावतीने पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याबाबत उपायुक्त डॉ. वैभव विधाते ह्यांनी दिलेल्या सूचनेनूसार हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी उपस्थितांना प्रदूषणाचे परिणाम, पर्यावरणपूरक दिवाळी कशी साजरी करावी याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच फटाकेमुक्त दिवाळी, ग्रीन फेस्टिवल आणि प्रदूषण मुक्त दिवाळी चे बॅनर बनवून जनजागृती करण्यात आली. तसेच उच्च न्यायालयाने संध्याकाळी आठ ते दहा यावेळेतच फटाके उडविण्याबाबत आदेश दिल्याचे उपस्थितांना सांगण्यात आले.

तसेच यावेळी माझी वसुंधराची प्रतिज्ञा घेण्यात आली. याबरोबरच शासनाच्या 'माझी वसुंधरा' या उपक्रमात सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने ही प्रतिज्ञा घेण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.









**पनवेल : प्रकाशाचा आणि दिव्यांचा असलेला दिवाळी हा सण सर्वत्र साजरा होत. या सणात ज्येष्ठांचा आशीर्वाद घेऊन दिवाळीच्या शुभेच्छा देण्याची परंपरा आहे. त्यानुसार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, उलवा नोड १ चे अध्यक्ष मदन पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट घेऊन त्यांचे आर्शिवाद घेत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.** (छाया : विकास म्हात्रे)

# उभ्या बसमधून डिझेलची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील मु.पो साई येथील नवभारत कन्स्ट्रक्शन कंपनीजवळ उभ्या करून ठेवलेल्या एका बसमधील डिझेल टाकीतून अज्ञात चोरट्याने १९५ लिटर डिझेल ज्याची किंमत जवळपास १८ हजार ३३० इतकी आहे याची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

गंगाराम गायकवाड यांनी त्यांच्या ताब्यातील बस (एमएच २० बीएल २२६७) ही नवभारत कन्स्ट्रक्शन कंपनी जवळ साई गाव येथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने बसमधील डिझेल टाकीतून अज्ञात चोरट्याने १९५ लिटर डिझेल (किंमत जवळपास १८ हजार ३३०) चोरी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दरम्यान, पनवेल परिसरामध्ये चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे समोर येत आहे.

**तळोजा : ज्येष्ठ पत्रकार वसीम पटेल यांच्या निवासस्थानी एका धार्मिक कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल, रहेमान ठाणगे, उपसाम ठाणगे, महमद अली आदी उपस्थित होते.**






**पनवेल : शंकर वायदंडे संपादीत रायगड सम्राट या दिवाळी अंकांचे प्रकाशन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी जि. प. सदस्य अमित जाधव, सामाजिक कार्यकर्ते गौतम पाटेकर, पत्रकार रवींद्र गायकवाड, अनिल कुरघोडे, शंकर वायदंडे, संतोष वाव्हल, राजेंद्र कांबळे, रवींद्र चौधरी, प्रशांत आवळे, उद्योजक मच्छिंद्र जाधव, जागृती फाऊंडेशन संदेश पाटील, कल्पेश कांबळे आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)

# पीरवाडी किनाऱ्याला मिळणार सुशोभीकरणाने नवा साज

**उरण : रामप्रहर वृत्त**

पिरवाडीला लाभलेल्या सुंदर समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांसाठी सुशोभीकरण करण्यात येणार असून त्याचा प्रस्ताव मेरिटाईम बोर्डाकडून तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे पर्यटकांसाठी या किनाऱ्याचे सुशोभीकरण करून त्याला नवीन साज चढविला जाणार आहे. हा उरणचा रत्नहार पर्यटकांसाठी सजविला जाणार असल्याने पर्यटकांना आकर्षित करून उरणच्या पर्यटन व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे.

उरणच्या पिरवाडी समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांनी मांदियाळी भरते. उन्हामुळे होणारी अंगाची काहिली शमविण्यासाठी तसेच शुद्ध हवेसाठी पर्यटक समुद्रात डुबण्याचा तसेच लाटांचा आनंद घेत आहेत. उरणमधील पिरवाडी हा तसा छोटासा किनारा आहे, मात्र तरीही या किनारपट्टीवर सुटीचा आनंद लुटण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. सध्या मुलांच्या शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. त्यामुळे पिरवाडी किनाऱ्यावरील पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. या परिसरात मुंबईच्या धर्तीवर उच्च दर्जाच्या राहण्या खाण्याच्या सुविधा म्हणून हॉटेल्स उभे राहिले आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील इतर समुद्र किनाऱ्याप्रमाणे समुद्री पर्यटनासाठी पर्यटकांची पावले आता वळू लागली आहेत. याचा परिणाम आपोआपच पर्यटन आणि इथल्या व्यवसाय वाढीवर होऊ लागला आहे.



## पर्यटकांची सुरक्षा करणे गरजेचे

सुट्ट्यामुळे उरणच्या पिरवाडी किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली आहे. पोहता न येणारे पर्यटकांच्या ही सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर आली आहे. उरणच्या किनाऱ्यावर स्वयंसेवी सागरी सुरक्षा करणाऱ्या तरुणांना जीव रक्षक साधना शिवाय बचावाचे काम करावे लागत आहे. पर्यटकांवर नजर ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेला पाहणी मनोरा ही सडून गेला आहे.


## पर्यटकांची संख्याही वाढती

पिरवाडी किनाऱ्यावर एक दर्गा असून या दर्ग्यावर येणारे भाविक हे मुंबई, ठाणे व नवी मुंबई सह इतर ठिकाणाहून येतात. यातील बहुतेक पर्यटक सुटीच्या दिवशी येतात. त्यामुळे सध्या पिरवाडी किनाऱ्यावरील पर्यटकांची संख्या वाढू लागली आहे.

**उरणच्या पिरवाडी किनाऱ्यावरील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली आहे. त्या कामाची सुरुवात लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे किनाऱ्यावर अनेक सुविधा रस्ता आदी उपलब्ध करण्यात येणार आहे.**

**-आमदार महेश बालदी**

# भाजप रायगड लोकसभा ओबीसी मोर्चा प्रमुखपदी ॲड. मनोज भुजबळ



**पनवेल : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांची रायगड लोकसभा ओबीसी मोर्चा प्रमुख म्हणून निवड करण्यात आल्याचे पत्र ओबीसी मोर्चा अध्यक्ष प्रदेश संजय गाते यांनी दिले आहे.

भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चा महाविजय २०२४च्या अनुषंगाने भाजप प्रदेश अध्यक्ष चन्द्रशेखर बावनकुळे यांचे मान्यतेने ॲड. मनोज भुजबळ यांची रायगड लोकसभा ओबीसी मोर्चा प्रमुख म्हणून निवड करण्यात आल्याचे ओबीसी मोर्चा अध्यक्ष प्रदेश संजय गाते यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

या जबाबदारी पार पाडत असतना आपण आपल्या संघटन कौशल्याने रायगड लोकसभा मतदार संघात ओबीसीच्या प्रश्नांना वाचा फोडून भारतीय जनता पक्षाचे ओबीसी मोर्चाचे संघटन वाढवाल अशी खात्री व्यक्त केली आहे

ॲड. मनोज भुजबळ यांची रायगड लोकसभा ओबीसी मोर्चा प्रमुख म्हणून निवड झाल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# फटाक्यांचा अतिरेक नको

दिल्ली असो वा मुंबई-पुणे, तिन्हीकडची हवेची स्थिती चिंताजनक असून वायूप्रदूषण कमी व्हावे याकरिता प्रभावी प्रयत्न हवेत म्हणून थेट पंतप्रधानांच्या कार्यालयानेही आदेश जारी केले. त्यानंतर सर्वच यंत्रणा प्रदूषणासंबंधातील नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीकरिता अधिक दक्ष झाल्या, परंतु हे प्रयत्न सुरू होऊ दोनएक दिवस होतात-न होतात तोवर दिवाळी सुरू झाली आणि पाठोपाठ दिल्ली-मुंबईत इतक्या प्रचंड प्रमाणात फटाके वाजवले गेले आहेत की पुन्हा वायूप्रदूषणाविषयी गंभीर चिंता निर्माण झाली आहे.

**यंदाची दिवाळी मागील काही वर्षांच्या तुलनेत अनेकांसाठी अधिक आनंदाची, अधिक भरभराटीची आहे याचा आनंदच आहे. दिवाळी हा सण सर्वार्थाने अवघा भवताल सकारात्मकतेने, चैतन्याने भरून टाकणारा आहे. दिवाळीच्या रोषणाईचा लखलखाट, रंगीबेरंगी आकाशकंदील, आजही दारोदारी स्थान टिकवून असलेल्या आकर्षक रांगोळ्या आणि लज्जतदार फराळ किती निरनिराळ्या तऱ्हांनी दिवाळीच्या या चार-आठ दिवसांत आपण आनंद अनुभवतो. मित्रमंडळींच्या सहवासात उत्सवाचा आनंद लुटताना नित्याचा ताणतणाव खरोखरच काही दिवसांकरिता बाजूला ठेवता येतो. अशा सर्वार्थाने समृद्धीचा अनुभव देणाऱ्या दिवाळीच्या सणातील एक अविभाज्य घटक असलेले 'फटाके' मात्र यंदा चिंता निर्माण करीत आहेत ही खरोखरीच दुर्दैवाची बाब आहे. गेले दोन आठवडे मुंबई व आसपासच्या परिसरातील वायू प्रदूषण आधीच चिंता वाटावी इतकी वाढले होते. संपूर्ण मुंबई महानगर प्रदेश धुरक्याने वेढला गेलेला सगळ्यांनीच प्रत्यक्ष पाहिला होता. मुंबईच नव्हे तर राजधानी नवी दिल्ली व पुण्यातील वायू प्रदूषणाविषयीची चर्चाही दिवाळीच्या दोनएक दिवस आधीच सुरू झाली होती. त्यामुळेच मुंबई उच्च न्यायालयाने व नंतर सर्वोच्च न्यायालयानेही फटाके वाजवण्यास अटकाव व्हावा म्हणून बंदी आदेश जारी केले. मुंबई उच्च न्यायालयाने आधी तीन तास फटाके वाजवण्यास अनुमती दिली होती तर नंतर हा कालावधी आणखी कमी करून रात्री आठ ते दहा असे दोनच तास फटाके वाजवण्यास परवानगी दिली. सर्वोच्च न्यायालयानेही आपल्या आधीच्या आदेशाबाबत स्पष्टीकरण करत बेरियम व तत्सम घातक रसायनांनी बनलेले फटाके वाजवण्यावर असलेली बंदी ही निव्वळ राजधानी दिल्लीपुरती मर्यादित नसून ही बंदी संपूर्ण देशासाठी लागू आहे असे स्पष्टपणे बजावले, परंतु त्यानंतरही सोमवारी सकाळी मुंबई व आसपासच्या परिसराला पुन्हा धुरक्याने वेढलेले दिसले. रविवारी दिवाळीच्या फटाक्यांनी प्रदूषणात भर घातल्यामुळे हे घडले असावे हे उघडच आहे. सिस्टिम ऑफ एअर क्वालिटी अँड वेदर फोरकास्टिंग अँड रिसर्च या संस्थेने मुंबई महानगर प्रदेशाचा हवेच्या दर्जेचा निर्देशांक सध्या २३४ असल्याचे जाहीर केले असून त्यामुळे मुंबईची हवा आता 'खराब' या श्रेणीत मोडते आहे. दिल्लीतही नागरिकांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला न जुमानता रात्री उशीरापर्यंत प्रचंड प्रमाणात फटाके फोडल्याने सोमवारी सकाळी राजधानीच्या अनेक भागांत हवेच्या दर्जाचा निर्देशांक आठशे-नऊशेच्या घरात म्हणजे अतिवाईट किंवा भीषण अशा श्रेणीत जाऊन पोहचला होता. दिल्लीसाठी तर या काळात प्रदूषण हे नित्याचे दुखणे होऊन बसले आहे. प्रदूषणाच्या बाबतीत मुंबईची दिल्ली करू नका, असा इशारा देत मुंबई उच्च न्यायालयाने फटाके वाजवण्यासाठी दोन तासांची अनुमती दिली होती. पण एकंदरच फटाक्यांचा हवेवर होणारा दुष्परिणाम लक्षात घेता या दोन तासांतही तारतम्य राखूनच फटाके वाजवायला हवेत हे स्पष्ट दिसते आहे.**

# नव्या युगाची सायबर गुन्हेगारी






आज प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आला आहे, सगळ जग स्मार्ट होत चालल आहे, पण माणूस स्मार्ट होताना दिसत नाही. २ जी गेल ३ जी आल, ३ जी गेल ४ जी आला आणि आता तर ५ जी चा दौर सुरू आहे. इंटरनेट सेवा इतकी फास्ट झाली आहे की आता ५ जी मुळे जगाच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकाला असलेल्या व्यक्तीच ऑपरेशन डॉक्टर्स करू लागले आहेत. इंटरनेटचे जाळ जगभर पसरले आहे. याला आता समुद्राचा, पर्वतांचा, वाळवंटचा किंवा आकाशाचा असा कसलाच अडथळा राहीलेला नाही.

माणूस आता जगात कधीच एकटा राहू शकत नाही किंबहुना ते आता शक्यही नाही. आज भारतीयांच्या आयुष्यात सर्वांत मोठे स्थान मोबाईल आणि इंटरनेटचे झाले आहे. ऑनलाईन खरेदी, चॅटींग गप्पा, ऑनलाईन बँक ट्रांजेक्शन, ऑनलाईन विंडो शॉपिंगचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. जिथे जास्त वापर तिथे फसवणूकीचे प्रकारही जास्त. आज मोबाईल च्या माध्यमातून विविध प्रलोभने दाखवून फसवणूक केली जात आहे. यामध्ये जात, धर्म, प्रदेश किंवा देश याला महत्व नसुन, समोरचा माणूस हा एक बकरा असुन त्याला फसवून त्याची लुबाडणूक कशी करायची यालाच हे लोक महत्व देत असतात. बर ते आपल्यातच कुठे तरी असतात, उघडमाथ्याने फीरत असतात मात्र अशा चोऱ्या किंवा घोटाळा करणाऱ्यांना चेहरा नसतो त्यामुळे ते समाजात बिंधास्त वावरत असतात. आज गृह विभागात सायबर क्राईम हा नवीन विभाग सुरू करण्यात आला आहे. मात्र पोलीस भरती करताना ग्राउंडला आणि लेखी परीक्षेला जास्त महत्त्व दिल जात त्यामुळे पोलीस दलात चांगले शिपाई मिळता, मात्र चांगले कॉम्प्युटर तज्ञ मिळत नाहीत. म्हणतात ना काट्यानेच काटा काढला जातो तसेच हॅकर्स ज्या पध्दतीने बँक अकाउंट अथवा मोबाईल हॅक करून चोरू करतात त्याच पध्दतीने हॅकर्सच्या मदतीने हे गुन्हे उकलने व गुन्हेगारांचा शोध लावला जातो, मात्र त्यासाठी उत्तम हॅकर्स हवे असतात की जे पोलीस भरतीत मिळत नाहीत. आज मुंबई



पोलीस काय की महाराष्ट्र पोलीस काय यांची तुलना स्कॉटलंडयार्ड पोलिसांशी केली जायची, मात्र बदलत्या गृन्हेगारीच्या युगात सायबर क्राईम कमी करायला, त्यावर आळा घालण्यासाठी आपले पोलीस कमी पडत आहेत.

**खबरबात**
**महेश शिंदे**

मुळात हे सायबर क्राईम आपल्याच हालगर्जी पणा मुळे घडतात. मोबाईलवरून आम्ही नेट बँकींग करून पैसे ट्रान्स्फर करतो किंवा गुगल पे, फोन पे सारख्या युपीआयने खरेदी करतो. खरंतर भारताची युपीआय पध्दती सर्वांत सुरक्षित व विश्वासार्ह आहे. नोट बंदी व कोरोना काळात याचा प्रभावीपणे वापर सुरू झाला, मात्र हे व्यवहार करताना काही काळजी घ्यायची असते तिथेच काही लोक गफलत करतात आणि मोठे आर्थिक नुकसान करून घेतात. यामध्ये आम्ही बँकेतुन बोलतोय तुमच एटीएम ब्लॉक झाल सुरू करण्यासाठी माहिती आणि ओटीपी मागीतला जातो आणि बँकेत चौकशी न करता आम्ही ही माहिती समोरच्या अनोळखी व्यक्तीला देऊन बसतो. इथेच आमची पहिली फसवणूक होते. बँक खाते हे चोर कोणताही दरोडा न टाकता रिकामे करतात. किंवा काही वेळा प्रलोभन देऊन बळी पाडल जात तर कधी हनी ट्रॅप करून म्हणजे एखादी तरुणी एखाद्या तरुणाशी किंवा पुरुषाशी फोन वरून मैत्री करते. काही दिवस चांगल्या प्रेमाच्या गप्पा मारल्या जातात आणि एके दिवशी माझा अपघात झालाय ताबडतोब पैसे पाठव अशी मागणी केली जाते. आपली मैत्रीण किंवा प्रेयसी अडचणीत आहे हे समजून आपण कोणताही विचार अथवा चौकशी न करता पैसे पाठवतो, तिथेच आपली फसवणूक होते. तर काही प्रकारात या मुली व्हिडिओ कॉल करून समोरच्याचा अर्ध नग्न व्हिडिओ बणवतात व तो व्हायरल करू अशी धमकी देऊ लुट करतात. या प्रकरणात लाजे खातर किंवा बदनामी होईल म्हणून कोणी पोलीस ठाण्यात तक्रार करीत नाहीत. इथच या चोरांचे फावते व ते इतर लोकांना लुबाडायला मोकळे होतात. काही प्रकरणात फेक कंपनीकडून ऑनलाईन विक्रीसाठी महागड्या गाड्या कमी किंमतीत विकण्याचे जाळे तयार केले जाते आणि यात मोहापायी अनेकजण अडकतात. खरेदीच्या नावाखाली आपली फसवणूक झालेय हे कळायला साधारण महिना तरी लागतो आणि मग आम्ही पोलीस ठाण्याला धाव घेतो. तिथ गेल तर पोलिसांचे लेक्चर ऐकाव लागत, तुम्ही एवढे शिकलेले, तुम्हाला कळत नाही का? वैगेरे वैगेरे आणि नंतर तक्रार घेण्यास टाळाटाळ केली जाते. बर वरून दबाव आणून जरी एखाद्या पोलीस ठाण्यात तक्रार घेतली तरी तपासाच्या नावाने शुन्य... कारण आरोपीला चेहरा नसतो, पत्ता नसतो तो असतो एकतर यूपी बिहारमध्ये किंवा नायजेरीयासारख्या दुसऱ्या देशात. तपास काय कपाळ लागणार? अशा प्रकारच्या सायबर क्रिईममध्ये हजारो घटनांमध्ये पाच दहाच तक्रार दाखल होतात, मात्र त्यातही गुन्ह्याचा व गुन्हेगाराचा शोध लागत नाही. सुदैवाने जरी एखाद गुन्हेगाराचा शोध लागला तरी त्या गुन्हेगाराला परदेशातुन आणण्यासाठी साठी पोलीस तक्रादाराकडेच पैसे मागतात. मग काय तक्रादार म्हणतो लाखासाठी बारालाख कुठे घालवायचे? यात कसला आलाय शहाणपणा?

आमच्या महाडच उदाहरण द्यायच झाल तर महाड मध्ये वर्षभरात शंभरएक सायबर क्राईमचे फसवणूकीचे प्रकार झाले असतील त्यात केवळ दोनच तक्रार दाखल आहेत आणि दोन्हीमध्ये आज वर्ष उलटून गेले तरी तपास सुरूच आहे. यात प्रश्न उपस्थित होतो पोलिसांच्या कर्तृत्वाचा. पोलीस प्रशासन यात कमी पडत म्हणून फसवणूक आणि लुटले जाऊनही लोक तक्रार करायला मागत नाहीत आणि त्यामुळे या अशा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांच फावत.

साबर क्राईम मध्ये अजुन एक भयान प्रकार म्हणजे तरुण मुलींचे प्रॉन व्हिडिओ बनवून ते विकले जाने. यातही या तरुणी व तिचे आई वडील बदनामी आणि भिती पोटी तक्रार दाखल करत नाहीत. या प्रॉन व्हिडिओचा काळा धंदा ड्रग आणि ब्राउनशुगर सारखा फोफावला आहे. यात मोठ्या मोठ्या सेलिब्रिटींजदेखील सहभागी असतात मात्र कोणालाच शासन होत नाही. हे सगळे अपराध पाहता यात अडकला जातो तो सर्वसामान्य माणूस मात्र थोडी सावधता बाळगली तर या अशाप्रकारच्या सायबर क्राईम वर आपण आळ घालू शकतो. कारण जेवढी जबादारी पोलीस प्रशासनाची आहे तेवढीच जबाबदारी आपलीदेखील आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# सावधान! व्हॉट्सअ‍ॅपवर विदेशी नंबरवरून होतेय फसवणूक




गेल्या काही दिवसांपासून व्हॉट्सअ‍ॅप चर्चेत आहे, कारण अनेकांना परदेशी नंबरवरून कॉल आणि मेसेज येत आहेत. आजच्या काळात लाखो-करोडो लोक व्हॉट्सअ‍ॅप वापरतात. त्यापैकी अनेकजण या आंतरराष्ट्रीय नंबरवरून येणाऱ्या फसवणुकीच्या कॉलला बळी पडतात. तुम्हालाही आंतरराष्ट्रीय कोडच्या नंबरवरून कॉल आला असेल तर सावध राहा!

ट्विटर, फेसबुकसारख्या सोशल मीडिया माध्यमांवर अनेकांनी +८४, +६२, +६० +२५४, +६३,+१(२१८) यांसारख्या नंबरवरून कॉल येत असल्याचे सांगितले आहे. हे कॉल साऊथ अफ्रिका, इंडोनेशिया, व्हिएतनाम, मलेशिया, केनया, इथोपियासारख्या काही देशांमधून येतात. आयएसडी कोडवरून हे कॉल कोणत्या देशातून आला आहे हे समजते. ज्या लोकांनी नुकतेच नवीन सिम कार्ड घेतले आहे त्यांनाही असे आंतरराष्ट्रीय कॉल येत आहेत. व्हॉइस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉलच्या माध्यमातून केले जातात. यामागे आंतरराष्ट्रीय स्कॅमर्सचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अशा कॉलद्वारे 'मालवेअर'सारखे धोकादायक व्हायरा तुमच्या फोनमध्ये पाठवला जातो. कित्येकदा ब्लँक कॉलही केले जातात अशा नंबरवरून व्हॉट्सअ‍ॅपवर एक लिंक पाठवली जाते. त्या लिंकवर क्लिक करणे धोकादायक असू शकते किंवा तुमच्या बँक अकाउंटमधून पैसे गायब होऊ शकतात. त्यामुळे असे कॉल कधीही उचलू नयेत किंवा अशा नंबरवरून आलेल्या मेसेजला रिप्लाय देऊ नये.


या फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅपने दोन महत्त्वाच्या गोष्टी सुचवल्या आहेत ज्या वापरकर्ते करू शकतात. अशा अनोळखी आणि संशयास्पद नंबरवरून आलेला कॉल उचलू नका किंवा मेसेजला रिप्लाय देऊ नका. असे सर्व संशयास्पद नंबर ब्लॉक करा आणि या फोन नंबरची व्हॉट्सअ‍ॅपवर तक्रार करा. अशा कोणत्याही नंबरवरून आलेल्या लिंकवर चूकनही क्लिक करू नका. काळजी घेऊनही अशी फसवणुकीची घटना घडल्यास लवकरात लवकर सायबर सेलची मदत घ्या.

# प्रसिद्ध चित्रकार रघुवीर मुळगावकर

रघुवीर मुळगावकर यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९१८ रोजी गोव्यातील अस्नोडा येथे झाला. त्यांचे वडील शंकर मुळगावकर हेही चित्रकार होते. त्यांचे मूळ आडनाव राजाध्यक्ष होते. गावाच्या नावावरून त्यांनी ते मुळगावकर असे केले. शंकररावांनी गोव्यात चित्रकलेचा एक वर्ग चालवला होता. रघुवीर मुळगावकरांचा थोरला भाऊदेखील चित्रकलेत पारंगत होता, पण दुर्दैवाने तो अल्पायुषी ठरला. पुढे रघुवीर यांनी वडिलांचा चित्रकलेचा वारसा सांभाळला. मुळगावकरांच्या शेजारी प्रसिद्ध चित्रकार ए.एक्स. त्रिंदाद (त्रिनिदाद) राहत. लहानपणी रघुवीर त्यांची चित्रे न्याहाळत बसत असत. त्रिंदादांनीही या मुलातील कलागुण हेरले व शंकररावांना रघुवीरास चित्रकला शिक्षणासाठी मुंबईला धाडण्यास सांगितले.

रघुवीर मुळगावकर मुंबईला आले. त्या काळात चित्रकार एस.एम. पंडित यांचे नाव कलाक्षेत्रात प्रसिद्ध होते. चित्रपट, पोस्टर, कॅलेंडर या माध्यमांतून पंडितांची कला लोकांना परिचित होती. मुळगावकरांनी मुंबईला आल्यानंतर काही काळ एस.एम. पंडितांकडे काढला. मुळगावकरांनी एकलव्याप्रमाणे पंडितांचे काम न्याहाळत त्यांची शैली जवळून अभ्यासली.

नंतर मुळगावकर गिरगावात स्थायिक झाले. तेथे कुलकर्णी ग्रंथागार, केशव भिकाजी ढवळे, ग.पां. परचुरे, रायकर यांच्या प्रकाशनांच्या पुस्तकांच्या वेष्टनांची कामे मिळू लागली. तो काळ



## निमित्त

मराठी साहित्यातला सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. पुस्तके, नियतकालिके यांच्यासोबत कॅलेंडरही मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत असत. बहुश: देवदेवतांची असणारी त्यांवरील चित्रे मुळगावकरांच्या कुंचल्याने नटू लागली. पूर्वीच्या पिढीत राजा रविवर्म्याने देवदेवतांची चित्रे काढून घरोघरी चित्रकलासंस्कार पोहचवण्याचे जे काम केले, तेच मुळगावकरांनी पुढे नेले. प्रल्हाद केशव अत्रे, विनायक दामोदर सावरकर, पु.ल. देशपांडे, चिं.वि. जोशी, अ.वा. वर्टी यांच्यासह अनेक साहित्यिकांच्या पुस्तकांची मुखपृष्ठे मुळगावकरांच्या कुंचल्याने सजली. त्याचप्रमाणे दीपलक्ष्मी, धनुर्धारी, वसंत, अनुप्रिता, नंदा, माधुरी, माणिक, अलका, पैंजण अशा अनेक नियतकालिकांची व त्यांच्या दिवाळी अंकांची मुखपृष्ठे मुळगावकरांच्या कुंचल्याने साकारली.

मुळगावकरांनी देवदेवतांप्रमाणे काही व्यक्तिरेखाही अमर केल्या. बाबुराव अर्नाळकरांचे धनंजय, छोटू, झुंझार-विजया, काळापहाड, धर्मसिंग, चारुहास आदी गुप्तहेर मुळगावकरांनी साकारले होते. दरमहा सहा कथा प्रसिद्ध होणाऱ्या या मालिकांना मुळगावकरांनी अशा रितीने सादर केले की धनंजय वगैरे पात्रे काल्पनिक असूनही वाचकांना ती खरीखुरी वाटत. मुळगावकरांनी कथाचित्रेही अमाप काढली. विशेषत: हाफटोनमधील वॉश चित्रे असोत, वा सरळ रेषांमध्ये काढलेली रेखाचित्रे, कृष्णधवल रंगांतील त्यांची कथाचित्रे देखणी असत. या कृष्णधवल रंगांमध्ये अनेक पौराणिक व ऐतिहासिक चित्रमालिका त्यांनी प्रसिद्ध केल्या. त्यामध्ये गणेश पुराण, रामायण, महाराष्ट्रातील संत आदी मालिका लोकप्रिय झाल्या. संख्येने सुमारे पाच हजारांच्यावर चित्रसंपदा निर्माण करणार्या मुळगावकरांची 'स्प्रे' या माध्यमावर जबरदस्त पकड होती. त्यांनी या माध्यमाचा वापर मोठ्या कुशलतेने केला. त्यांच्या कामाचा झपाटादेखील मोठा होता.

त्यांची भावजय व प्रसिद्ध गायिका नलिनी मुळगावकर यांनी संपादलेल्या रत्नदीप दिवाळी अंकामध्ये त्यांनी कथाचित्रे व चित्रमालिका चितारणे आरंभले. पुढे त्यांनी स्वतःचा रत्नप्रभा हा अंक सुरू केला. या वार्षिकामधून त्यांनी आपली खास चित्रे रसिकांसमोर आणली. अशा या महान चित्रकाराचे ३० मार्च १९७६ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**

**(छाया : सुबोध ठाकूर)**



**पनवेल : दिवाळीनिमित्त शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटी मैदानावर किल्ले रायगडची प्रतिकृती साकारण्यात आली आहे.**

## आरोग्य प्रहर

# सर्दी-खोकल्यावर घरच्या घरीच करा 'हा' उपाय

दिवाळीमध्ये थंडीत पहाटे उठून अभ्यंग स्नान आणि नवीन कपडे घालून फराळाचा आस्वाद घेण्याची परंपरा पाळली जाते. गेल्या काही वर्षांपासून दिवाळीत थंडी गायब होत असल्याचे दिसते. यंदा तर दिवाळीत महाराष्ट्राच्या काही भागात पावसाने हजेरी लावली. नोव्हेंबर महिन्याचा मध्य आलेला असताना अशावेळी अचानक वाढलेला उकाडा आणि त्यात पावसाळी दमट हवा यामुळे वातावरण बदलल्याचे चित्र आहे.



गेल्या काही वर्षात हवामानात सातत्याने होणारे हे बदल आपल्या आरोग्यावरही परिणाम करत असतात. सतत हवा बदलली की त्याचा शरीरावर परीणाम होतो आणि आजारपणांचे प्रमाण वाढते. लहान मुलांची प्रतिकारशक्ती तयार होत असल्याने त्यांच्यामध्ये सर्दी, खोकला, कफ, ताप यांसारख्या तक्रारी वारंवार भेडसावताना दिसतात. ऐन सणावारात मुलं आजारी असली की घरातल्या सगळ्यांचाच मूड जातो आणि सणाचा आनंद लुटण्यावर बंधने येतात. हवाबदलामुळे उद्भवणाऱ्या या तक्रारींवर उपाय म्हणून नेमके काय करायचे याबाबत डॉ. प्रियांका त्रिवेदी काही महत्त्वाचे उपाय सांगतात...

पायांच्या तळव्यांना तेल चोळणं हा उपाय केवळ थंडीत शरीर गरम राखण्यासाठी करतात हा गैरसमज आहे. उन्हाळ्यातल्या रात्रीही पायांच्या तळव्यांना तेलाचा मसाज आवश्यक असतो. पाय हा आपल्या शरीराचा भार पेलणारा मुख्य अवयव असल्याने त्याची विशेष काळजी घ्यायला हवी. पायांच्या तळव्यांना मसाज केल्यास शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्यासही फायदे होतात. पायाला मसाज केल्याने रक्तप्रवाह सुधारतो, थकवा कमी होतो, शांत झोप येते हे फायदे आपल्याला माहित असतात. पण पायांना विशिष्ट तेलाने मालिश केल्यामुळे सर्दी-कफाची समस्या दूर होण्यासही चांगलीच मदत होते.

साधारण अर्धी ते पाऊण वाटी मोहरीचं तेल घ्यायचं. यामध्ये लसणाच्या बारीक कापलेल्या पाच पाकळ्या आणि एक चमचा ओवा घालावा. त्यानंतर हे तेल साधारण पाच ते १० मिनीटे चांगले गरम करायचे. गरम केल्याने लसूण आणि ओव्याचा अर्क या तेलामध्ये उतरण्यास मदत होईल. त्यानंतर तेल गार झाल्यावर गाळून ठेवायचे. रात्री झोपताना हे तेल पुन्हा थोडे कोमट करुन घेऊन पायांना आणि लहान मुलांच्या छातीला लावायचे. यामुळे सर्दी, कफ कमी होण्यास मदत होईल.

# पाताळगंगा नदी होतेय प्रदूषित

## दोन दिवसांपासून पात्रात फेसयुक्त पाणी

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवाळीत फटाक्यामुळे प्रदूषण होईल याबाबत एकिकडे जनजागृती सुरू असताना पाताळगंगा नदीपात्रात प्रचंड प्रमाणात फेस दिसून येत आहे. पाताळगंगा नदीत पंधरा दिवसापूर्वी मृत माशांचा खच आढळून आल्यानंतर खळबळ माजली होती.

तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीच्या पेयजल योजना पाताळगंगा नदीवर असून खोपोली नगर परिषददेखील पाताळगंगा नदितील पाणी वापरते. प्रदूषण मंडळाने याबाबत दखल घेत पाण्याचे नमुने तपासणीसाठी नेले होते, परंतु याबाबत कठोर कारवाई होत नसल्याने याचा फायदा सांडपाणी विल्हेवाट लावणारे घेत आहेत.

दोन दिवसांपासून नदीपात्रात फेसयुक्त पाणी मोठ्या प्रमाणात येत आहे. त्यामुळे पुन्हा नागरिकांच्या जिविताशी खेळ सुरू असून प्रशासनाने केवळ सणापुरती प्रदूषण बाबत जागरुकता दाखविण्यापेक्षा प्रदूषणाला जबाबदार असलेल्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.



**मोठ्या प्रमाणात उग्रवास**

पाताळगंगा प्रदूषणामुळे नदीच पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा अलिबागचा सूक्ष्मजिवीय पाणी नमुन्याचा अहवालात पाताळगंगा नदिचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे देण्यात आले आहे. उग्र वास तसेच पाण्यामुळे त्वचारोगदेखील वाढ झाली आहे.

**काही टँकर थेट नदीपात्रात टँकर सफाई करतात तर कारखान्यांच सांडपाणी ईटीपी प्लांटमध्ये नेण्याऐवजी रात्रीच्या वेळेस नदीपात्रात सोडतात. कारखान्यात तपासणी करुन सांडपाणी विल्हेवाट प्रक्रियेची माहिती, तपासणी केल्यास काही प्रमाणात आळा बसेल.**
**–शितल वाघरे, खालापूर**

# मुख्यमंत्र्यांकडून खालापूर तहसीलदार, प्रशासनाचे कौतुक

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील चौक येथील इर्शाळगड दुर्घटनेत आपतकालीन परिस्थितीत खालापूर प्रशासनाच्या वतीने सर्व स्टाफ व बचाव पथकाच्या साह्याने ७२ तासांत प्रयत्नांची पराकाष्ठा करीत अनेक जीवांना जीवदान दिले. या कार्याची दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेत खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी व प्रशासनाचे कौतुक केले आहे.

तहसीलदारांना प्रशस्तीपत्रक मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी इर्शाळवाडी पुनर्वसनस्थळी देत त्यांचे कौतुक केले. प्रशासनाच्या वतीने इर्शाळगड पुनर्वसन वस्तीत दिवाळी फराळ आणि भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. या वेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी आमदार महेंद्र थोरवे त्याचप्रमाणे प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




(छाया : जयवंत माडे)

इर्शाळवाडीतील मन हेलावून टाकणाऱ्या परिस्थितीत सामोरे जाणे हे शासनाचे प्रशासनाचे कर्तव्यच आहे, पण आपण व इतर अधिकाऱ्यांनी या बचाव कार्यात मोलाचे योगदान देत अवघ्या ७२ तासांत प्रश्नांची पराकाष्टा करीत अनेक जीवांना जीवनदान दिले. इर्शाळवाडीचे पुनर्निर्माण करण्यासाठी जे आपण व प्रशासनाने प्रयत्न केले म्हणून ही वाडी धैर्याने आज उभी आहे. वर्षभरात शासनात तर्फे पक्की घरे देण्यासाठी प्रयत्नशील आहोत तुम्हा सर्व अधिकाऱ्यांच्या जिद्दीला, साहसांला व इच्छाशक्तीला शासनाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्र्यांनी तहसीलदारांना दिलेल्या प्रशस्तीपत्रात प्रशंसा नमूद करण्यात आली आहे.

खासदार शिंदे यांच्या हस्ते तहसीलदार आयुब तांबोळी, सोबत आमदार महेंद्र थोरवे, कोकण आयुक्त महिंद्र कल्याणकर, चौक सरपंच रितू ठोंबरे आदींनी प्रशस्तीपत्र स्वीकारले.

# कुंभेवाडीतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील जिते ग्रामपंचायत मधील कूंभे वाडी मधील कार्यकर्त्यांचा शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटातील कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्ष मध्ये प्रवेश केला. त्या सर्वांचे स्वागत आमदार महेंद्र थोरवे यांनी केली.



जिते ग्रामपंचायत कुंभेवाडी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षातील कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्ष प्रवेश करून तेथे या दोन्ही पक्षांना खिंडार पाडले. कुंभेवाडी येथील तरुण कार्यकर्त्यांनी कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्ष प्रवेश केला. हरिचंद्र मिरकुटे, बालू हिलम, दिनेश हीलम, पंढरी हीलम, विशाल पवार, परेश मिरकुटे बबन पवार, कैलास मिरकुटे, गणेश पवार, नितीन मिरकुटे, शिवाजी वाघे, रवी हिलम, सुनील पवार, कैलास मिरकुटे, रामदास मिरकुटे, ज्ञानेश्वर पवार, प्रदीप हीलम आदी कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

या वेळी युवसेना कर्जत तालुका उप अधिकारी विनायक घरत, शिवसेना पिंपलोली पंचायत समिती संपर्क प्रमुख अतिश भोईर, रुपेश जाधव, दीपक भोईर, सागर भोईर, समीर राणे, प्रमोद बोराडे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# बँक काऊंटरवरून ग्राहकाचे पैसे चोरीस

**खोपोली : प्रतिनिधी**

मिश्रीलाल विश्वकर्मा हे ५० हजार रुपये काढण्यासाठी पंजाब नॅशनल बँक शाखा खोपोली येथे गेले होते.

या वेळी काउंटरच्या आत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी ५० हजार रुपये विश्वकर्मा यांच्या हातात दिले. विश्वकर्मा पेमेंट काऊंटरवर आपले पेमेंट बरोबर आहेत का, हे मोजत होते. त्यावेळी एक अज्ञात ग्राहक तिथे आला आणि तो म्हणाला भाईसाब ऐक नोट खराब है उसे बाहेर निकाल दो तेव्हा विश्वकर्मा त्याला म्हणाले आप मुझे मत सिखाओ तरी पण त्यांनी त्याचे पेमेंट हातात घेतले व त्याच वेळेला त्याचा दुसरा मित्र



ग्राहक बनून मागे उभा होता व त्यांनी विश्वकर्मा यांना मागून हात लावला लक्ष विचलित केले. त्यामुळे विश्वकर्मा यांनी मागे वळून पाहिले आणि त्याच वेळी बाजूला असलेल्या व्यक्तीने हातातील बंडलमधील काही रक्कम घेऊन बाहेर निघाला आणि मागे उभा असलेला व्यक्तीसुध्दा मागे पळाला विश्वकर्मा यांनी दोन वेळा पेमेंट मोजले ते १४,५०० रुपये कमी निघाले.

दरम्यान, या घटनेबाबत सीसीटिव्ही कॅमेऱ्यात ज्यावेळी पाहिले असता त्यावेळी संपूर्ण चित्र समोर आले की दोन व्यक्ती पैकी ऐक व्यक्ती पहिली आता आली व विश्वकर्माच्या बाजूला उभी राहिली व दुसरी व्यक्ती येऊन मागे उभी राहिली आणि अशा प्रकारे बँकेच्या आत येऊन ग्राहकाचे पैसे काऊंटर वर चोरीस गेले. विश्वकर्मा या ग्राहकाने खोपोली पोलीस स्टेशनमध्ये याबाबत लेखी तक्रार दिली केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

# कर्जतमध्ये दिवाळी संध्या

**कर्जत : प्रतिनिधी**

बाळासाहेबांची शिवसेना कर्जत शहराच्या वतीने आयोजित केलेल्या कालावैभव आणि स्वर वैभव निर्मित 'स्वर मैफल' दिवाळी संध्या संगीत मैफलीमध्ये गायकांनी सादर केलेल्या जुन्या-नव्या गीतांमुळे कर्जतकर मंत्रमुग्ध झाले. या वेळी साथ संगत देणाऱ्या कलाकारांनी उपस्थितांची वाहवा मिळवली


कर्जतमधील श्री कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात दिवाळी संध्या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून मैफलीचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी माजी उपसभापती मनोहर थोरवे, नगरसेवक संकेत भासे, कविवर्य अरुण म्हात्रे, बाळासाहेबांची शिवसेना शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, प्रसाद पाटील, अभिनेता राहुल वैद्य आदी उपस्थित होते. संयोजक चैतन्य जोशी आणि गायक वैभव थोरवे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

# मध्य रेल्वेची ७.३५ दशलक्ष टन मालवाहतूक

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे ऑक्टोबर २०२३ महिन्यात ७.३५ दशलक्ष टन मालवाहतूक केली जी ऑक्टोबर-२०२२ महिन्यातील ५.९७ दशलक्ष टन लोडिंगच्या तुलनेत २३.०१ टक्के अधिक आहे. ऑक्टोबरच्या कोणत्याही महिन्यामध्ये हे आतापर्यंतचे सर्वाधिक मासिक ओरिजिनेट लोडिंग आहे. मध्य रेल्वेने महिन्याचे ७.०७ मेट्रिक टनाचे उद्दिष्ट ओलांडले जे ४.०० टक्क्यांची वाढ दर्शवित आहे. ही ऑक्टोबरच्या कोणत्याही महिन्यातील सर्वोत्तम लोडिंग आहे.

मध्य रेल्वेने एप्रिल-ऑक्टोबर २०२३-२४ या कालावधीसाठी ४९.०३ मेट्रिक टन लोडिंग नोंदवले आहे, जे एप्रिल ते ऑक्टोबर-२०२२ मध्ये ४३.९८ मेट्रिक टन होते, त्यात ११.५०% वाढ झाली आहे, हे देखील मध्य रेल्वेवर ऑक्टोबर ते



एप्रिलच्या कालावधीसाठी वार्षिक मूळ लोडिंग आहे.

नेट टन किलोमीटर (NTKMs) जी ऑक्टोबर-२०२३ मध्ये ३३५९ दशलक्ष झाली जी ऑक्टोबर-२०२२ मधील ४३८६ दशलक्षच्या तुलनेत २१.९० टक्के वाढ झाली आहे.ऑक्टोबर-२०२२ मधील रु. ६३६ कोटींच्या तुलनेत ऑक्टोबर २०२३ मध्ये ८०२ कोटी रुपयांचा मालवाहतूक महसूल मिळवले आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत २६.१० टक्के जास्त आहे.

# कोकणनामा दिवाळी अंकाचे प्रकाशन

**अलिबाग : प्रतिनिधी**

साहित्यिक-पत्रकार उमाजी केळुसकर संपादित सा. कोकणनामा दीपावली विशेषांक २०२३ चे प्रकाशन रविवारी (दि. १२) अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था, अलिबागचे अध्यक्ष, साहित्यिक, कोकण भूषण कैलास पिंगळे यांच्या हस्ते अलिबाग येथे कोकणनामा कार्यालयात करण्यात आले.

या प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी मॉर्निंग वॉक ग्रुप, आंबेपूर-पेझारीचे अध्यक्ष, पत्रकार, कोकण भूषण प्रकाश नागू म्हात्रे होते. तर साहित्यिक रमेश धनावडे, ज्येष्ठ नागरिक संस्था, अलिबागच्या उपाध्यक्ष चारुशिला शरद कोरडे, मॉर्निंग वॉक ग्रुप, आंबेपूर-पेझारीचे सदस्य सुरेशदादा म्हात्रे, कोकणनामाच्या व्यवस्थापिका योगिता केळुसकर, संपादक, साहित्यिक उमाजी केळुसकर, निवासी संपादक, नाट्य-चित्र अभिनेते, साहित्यिक शरद कोरडे आदी उपस्थित होते.




या वेळी अध्यक्षीय भाषणात पत्रकार प्रकाश म्हात्रे यांनी कोकणनामा दिवाळी अंक वाचकांसाठी मोठी पर्वणी असल्याचे सांगितले, तर साहित्यिक कैलास पिंगळे यांनी कोकणनामा दिवाळी अंकाचे प्रकाशन झाल्याचे सांगताना दिवाळी अंक दर्जेदार झाला असून त्याबाबत कोणतीही तडजोड केली नसल्याचे दिसून येत असल्याचे सांगितले.

साहित्यिक रमेश धनावडे यांनी स्पर्धात्मक पातळीवरही कोकणनामा दिवाळी अंक अव्वल असल्याचे सांगितले. उपाध्यक्षा चारुशिला कोरडे यांनी दिवाळी अंकाला शुभेच्छा दिल्या. प्रारंभी संपादक उमाजी केळुसकर यांनी प्रास्ताविक केले. समारोप निवासी संपादक शरद कोरडे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.


# चिमुरड्यांच्या शिवमल्हार ग्रुपने साकारला दहिवलीत प्रतापगड

**कर्जत : प्रतिनिधी**

दिवाळी म्हटलं की, घरोघरी गडकिल्ले बनवण्याची लगबग सुरू होते, पण दहिवलीतील गुरव आळीमधील मुलांनी एकत्र येऊन एकच गड साकारला. त्यासाठी त्यांनी परीक्षा संपल्यावर प्रतापगडाचा संपूर्ण अभ्यास केला तसेच इतिहास अभ्यासक आणि संशोधक सागर माधुरी मधुकर सुर्वे ह्यांची विशेष मदत त्यांना लाभली.

साधारणतः हा गड १५ X ८ फूट इतक्या मोठ्या परिसरात साकारण्यात आला आहे. जसा आहे तसा गड बनवण्यासाठी शिवमल्हार ग्रुपला चार दिवस लागले. मोठ्या दगडी आणि शेतातील मातीने हा गड बांधण्यात आला. गडावरील तटबंदी व आतील वास्तूंची नावे त्यांनी दिली असून गडाची ऐतिहासिक माहिती सुद्धा या ग्रुप आधील सदस्य पाहायला येणाऱ्या प्रत्येकाला सांगत आहे.

प्रतापगड बनवण्यासाठी ओमकार कनोजे, सार्थक गुरव, जय माळी, ईशांत मालुसरे, भव्य सुर्वे, युगान सुर्वे, यज्ञेश



कनोजे आणि वेदांत सुपे ह्यांनी मेहनत घेतली आहे. ह्या ग्रुपमधील प्रत्येक जण छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध घटनांचा व पैलूंचा अभ्यास करत असून प्रत्येक वर्षी विविध गड अभ्यासून तसाच गड प्रत्येक दिवाळीत करण्याचा त्यांचा मानस आहे. इतिहास प्रत्येकाने अभ्यासावा आणि त्यातील पैलू आपण आत्मसात करावेत म्हणून त्यांचा प्रयत्न आहे. या कामगिरीमुळे दहिवलीतील पाचवी ते नववी मधील या विद्यार्थ्यांचे अनेक ठिकाणी कौतुक होत आहे.

दरम्यान, हा किल्ला पाहण्यासाठी नागरिक गर्दी होत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे - मोहो, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील व्यक्तीच्या नावे असलेली, प्रत्यक्ष ताबेकब्जातील, तसेच खुद्द मालकी हक्काची खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे - मोहो, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालकांची नावे | भुमापन क्र. | हिस्सा | भुधरणा पद्धती | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| श्री. पुंडलिक दिनकर पाटील | ३ | ३ | भोगवटदार वर्ग-१ | ०-१८-०० + पो.ख. ०-०४-०० = ०-२२-०० | २.२५ |

सबब वर नमुद जमीन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही नमूद केलेल्या भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ दिवसांच्या आत हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल यांची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १३/११/२०२३

सही/ -
ॲड. अनिल रा. नागदेवे

ऑफिस :- गाळा नं. १११, ११२, १ ला मजला, म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं. १ व २, पनवेल, ता.पनवेल - ४१०२०६, जि. रायगड. मो. नं. ९८२०५७७१६८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या परिशिष्टा मध्ये वर्णन केलेला युनिट माझे आशिल श्री. दिलीप व्यंकटराव जाधव हे विक्री करारनामा करून प्रस्तुत मालक श्री. दत्ता सोनबा वाघ यांच्याकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर युनिट च्या मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| भुखंड क्र. | युनिट क्र. | सोसायटी | टाईप | क्षेत्रफळ | सेक्टर क्र. व नोड |
|---|---|---|---|---|---|
| सी-२ | २१ | विश्वकिरण को.ऑप. हौ.सो.लि. | एस एस १ बी | २८.०० चौ.मी. बांधीव | सेक्टर नं. -७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल प. |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्ट मध्ये नमुद केलेल्या युनिट मिळकतीमधील हिस्सावर वा भागावर कोणीही व्यक्तिचे कसल्याही प्रकारचे करार, मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरूपी हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र एम.ओ.यू तत्सम कोणतेही दावे, मालकी, व अन्य हक्क, हितसंबध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतानी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाचे आत आपल्या हक्क हितंसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर लेखी कळावे अगर अगर समक्ष येवुन भेटावे, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार दावा, न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क, हितसंबध नाही असे समजुन आमचे पक्षकार सदर सब प्लॉट / युनिट मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे कामपुर्ण करतील. व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती, या रद्दबातल आहेत. व त्या जाणीवपुर्वक सोडून दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल यांची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

स्थळ - पनवेल,
दिनांक : १३/११/२०२३

सही/-
सुनिल दशरथ गायकवाड
ॲडव्होकेट

शॉप नं ३, साई धाम बिल्डींग, प्लॉट नं. -१४८, सेक्टर आर-३, वडघर, पुष्पक नोड, पनवेल रायगड, पिन-४१०२०६
मो. नं. - ७५०६४९४०३०

# दिवाळीनिमित्त नवी मुंबईत स्वच्छता मोहीम

## स्वच्छता मित्रांनी गोळा केला २७ टन ७०० किलो कचरा





**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून विविध प्रकारचे साहित्य खरेदी करण्यात येत असल्याने सगळीकडच्या बाजारपेठा व दुकाने गजबजून गेलेली दिसतात. यामुळे कचऱ्याच्या प्रमाणातही मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. या अनुषंगाने स्वच्छ शहर म्हणून असलेला नवी मुंबईचा नावलौकिक लक्षात घेऊन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निर्देशानुसार केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत अभियान २.०' अंतर्गत 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' या अभियानामध्ये स्वच्छताविषयक विविध उपक्रम राबविले जात आहेत.

दिवाळीच्या दिवसात मोठ्या प्रमाणात फटाकेही वाजविले जात असल्याने रस्त्यावरील कचऱ्यात नेहमीपेक्षा अधिक भर पडल्याचे निदर्शनास येते. यादृष्टीने लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाके वाजविण्याचे प्रमाण जास्त असल्याने नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर मार्गदर्शनाखाली, लक्ष्मीपूजनाच्या रात्री नवी मुंबई महापालिका परिसरात बेलापूर ते दिघा अशा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या नियंत्रणाखाली, १३ नोव्हेंबर रोजी पहाटे १ ते ५ वाजेपर्यंत स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या विशेष स्वच्छता मोहीमेकरिता आठही विभाग कार्यालय क्षेत्रात ३७५ सफाई कर्मचारी यांची विशेष नेमणूक करण्यात आली होती. १० रिफ्युज कॉम्पॅक्टर वहाने आणि १३ मिनी टिपर वहाने यांच्या माध्यमातून या स्वच्छता मोहीमेत गोळा करण्यात आलेला प्रामुख्याने फटाक्यांच्या कचऱ्यासह इतर कचरा तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी शास्त्रोक्त प्रक्रियेसाठी त्वरित वाहून नेण्यात आला.

स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे या संपूर्ण साफसफाई मोहीमेच्या नियोजनबध्द कार्यवाहीवर मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत सर्व ठिकाणी भेटी देत बारकाईने लक्ष ठेवून होते.

शहरातील आठही विभागातील मुख्य रस्ते, बाजारपेठा, मुख्य चौक, वर्दळीची ठिकाणे अशा नागरिकांची गजबज असलेल्या स्थळांवर पहाटे १ ते ५ या कालावधीत राबविलेल्या या विशेष साफसफाई मोहीमेमध्ये हार, फुले. खाद्यपदार्थ यांचा ९ टन ६०० किलो ओला कचरा तसेच विशेषत्वाने फटाके,कागद, पुठ्ठे, कापड यांचा १८ टन १०० किलो सुका कचरा गोळा करून एकुण २७ टन ७०० किलो कचरा स्वतंत्र वाहनांमध्ये तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला.

### नागरिकांकडून प्रशंसा

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी या मध्यरात्रीच्या विशेष स्वच्छता मोहीमेचे सुव्यवस्थित नियोजन करून तसेच स्वत: सर्व विभागांमध्ये फिरुन साफसफाईवर लक्ष देतानाच सकाळच्या नियमित साफसफाईवर कोणताही परिणाम होऊ दिला नाही. मध्यरात्री व पहाटे ही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असली तरी दररोज सकाळी होत असलेली साफसफाई नेहमीप्रमाणेच सुरू असल्याने नागरिकांनी प्रशंसा करीत समाधान व्यक्त केले.

# भावे नाट्यगृहात पार्किंगसाठी आता पैसे द्यावे लागणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील महापालिकेच्या वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहातील पार्किंगसाठी अखेर कंत्राटदार मिळाला आहे. त्यामुळे मनपाच्या तिजोरीत वर्षाकाठी एक लाख ८०० रुपयांची भर पडणार आहे, मात्र दुसरीकडे अगोदरच नाटकांचे दर सर्वसामान्यांना परवडणारे नाहीत त्यात आता पार्किंगलाही पैसे द्यावे लागणार असल्याने रसिक प्रेक्षक नाराज आहेत.



शहरातील मध्यवस्तीत असलेले मनपाचे अद्ययावत विष्णुदास भावे नाट्यगृह प्रांगणात सुमारे १०० चारचाकी वाहने तर तेवढ्याच संख्येने दुचाकी उभी करण्याची जागा आहे. या जागेवर पार्किंग वसुलीसाठी असलेल्या कंत्राटदाराने कोरोना काळात नाटके बंद असतानाही मनपाच्या वसुलीस कंटाळून काम अर्धवट सोडले. त्यामुळे करोनानंतर नाट्यगृह पार्किंग कंत्राटासाठी अनेकदा निविदा काढण्यात आल्या, मात्र त्याला कोणीही प्रतिसाद दिला नाही. दर खूप जास्त आणि त्यामानाने कमाई कमी असल्याने कोणीही उत्सुक नसल्याचे लक्षात आल्यावर दर कमी करण्यात आले. या ऑनलाईन टाकण्यात आलेल्या कंत्राटला ठाण्यातील आटो फॅब यांनी प्रतिसाद दिल्यावर काम त्यांना देण्यात आले आहे. १ नोव्हेंबरपासून पार्किंग वसुली त्यांनी सुरू केली आहे.

नवी मुंबईतील कंत्राट दाराने हे काम घेण्यास उत्सुकता दाखवली नाही या बाबत मनपातील एका कर्मचाऱ्याने माहिती देताना सांगितले की ऑक्टोबर ते मार्च दरम्यान उत्तम व्यवसाय होतो अन्य वेळेस नाटकांचे खेळ जास्त लागत नाहीत. त्यात राजकीय मेळावा सारखे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होतात मात्र या कार्यक्रमाला येणारा एकही वाहन चालक पार्किंगचे पैसे देत नाही. मागितले तर दादागिरी वादावादी सारखे प्रकार होतात. ही माहिती नवी मुंबईकरांना आहे.

मराठी नाटकांना आता प्रेक्षक दाद देत नाही अशी ओरड होते मात्र प्रत्यक्षात महिन्यातून दोन नाटके जरी कुटुंबासमवेत पहिली तरी महिन्याचे आर्थिक गणित बिघडते म्हणून प्रेक्षक रोडवला आहे. त्यात आता पार्किंगला पैसे द्यावे लागणार आहेत.

> **वर्षाला १ लाख ८०० म्हणजे महिन्याला केवळ आठ हजार ४०० रुपये मनपाच्या तिजोरीत भर पडणार. साडेचार हजार कोटींचा अर्थसंकल्प मानणाऱ्या पालिकेच्या तिजोरीत ही रक्कम पडली नाही तर फारसा फरक पडणार नाही मात्र रसिक प्रेक्षकांना फरक पडतो.**
> **-माधुरी फसळकर, रसिक प्रेक्षक**

# 'चान्सरीग्राफी पुस्तक सुलेखनासाठी मार्गदर्शक'



**नवी मुंबई : बातमीदार**

शब्दांमधील अक्षरांमध्येही 'बिटविन द लाईन्स' असे भाव असतात हे सुलेखनकार अच्युत पालव यांच्यामुळे समजले अशा शब्दात त्यांच्या सुलेखनाचा गौरव करीत त्यांची अक्षरावर हुकूमत पाहून थक्क व्हायला होते अशा शब्दांत नवी मुंबई पालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

लहानपणापासून अक्षर चांगले असल्याने सुलेखनाची आवड होती आणि चांगले अक्षर प्रेम करायला लावते याची जाणीव असल्याने अच्युत पालव यांच्याकडून सुलेखनाचे धडे घ्यावेत अशी अनेक वर्षांपासूनची इच्छा होती. ती कामाच्या व्यस्त दिनक्रमात पूर्ण होऊ शकली नाही तरी आज अच्युत पालव लिखीत सुलेखनावरील पुस्तकाचे प्रकाशन करण्याचा योग लाभला ही आपल्यासाठी आनंददायी गोष्ट असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

बेलापूर रेल्वे स्टेशन कमर्शिअल कॉम्प्लेक्स आणि अच्युत पालव स्कूल ऑफ कॅलिग्राफी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अक्षर दिवाळी' कार्यक्रमांतर्गत सुलेखनकार अच्युत पालव यांच्या कॅलिग्राफीवरील 'चान्सरीग्राफी' या नवीन पुस्तकाच्या प्रकाशन सोहळा नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या शुभहस्ते बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स येथे संपन्न झाला. याप्रसंगी सुलेखनकार अच्युत पालव, बेलापूर रेल्वे स्टेशन कमर्शिअल कॉम्प्लेक्सचे संचालक भार्गव, ऊर्जा प्रकाशनच्या प्रमुख श्रध्दा पालव, कॉम्प्लेक्सचे पदाधिकारी वैभव महाजन आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबई शहराविषयी असलेली बांधिलकी जपत सुलेखनकार अच्युत पालव यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या आगळ्या वेगळ्या चित्रकाव्यभिंती संकल्पनेला आपल्या सुलेखनाने जिवंत केले. त्या कविता इतक्या आकर्षक अक्षरांनी अच्युत पालव यांनी सजविल्या की कुणालाही अक्षरे पाहूनच त्या वाचण्याचा मोह व्हावा असे सांगत आयुक्त राजेश नार्वेकर यांनी चान्सरी शैलीतील हे कॅलिग्राफीचे मॅन्युअल सुलेखनाची आवड असणाऱ्या प्रत्येकाला मार्गदर्शक दिशा दाखविणारा अक्षरदिवा ठरेल असा विश्वास व्यक्त केला. महेंद्र कोंडे यांनी कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन करीत कार्यक्रम रंगतदार केला.

### रांगोळीतून रंगाक्षरांचा शुभेच्छा संदेश

या वेळी अच्युत पालव स्कूल ऑफ कॅलिग्राफीच्या १५ सुलेखनकार विद्यार्थ्यांनी शुभ दीपावली हा संदेश विविध १५ भाषांमध्ये गोलाकार लिहून १० फूट x१० फूट आकाराची मोठी अक्षर रांगोळी रेखाटली. या रांगोळीमध्ये आयुक्तांच्या समक्ष 'रंग दिवाळी अक्षर दिवाळी' हा रंगाक्षरांचा शुभेच्छा संदेश काही क्षणात रेखाटत सुलेखनकार अच्युत पालव यांनी शुभेच्छा रंग भरले.



(छाया : दिनेश पवार)

# उरणमध्ये साकारली पद्मदुर्गची प्रतिकृती

**उरण :** उरण शहरातील हरी पांडव पथ मित्र मंडळ यांनी मुरूड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांनी पाण्यात बांधलेल्या पद्मदुर्गा किल्ल्याची प्रतिकृती साकारलेली आहे.

हा किल्ला बनविण्यास १५ दिवस लागले असून किल्ला पाहण्यासाठी बच्चे कंपनीची खूपच गर्दी असले. किल्ला बनविण्यासाठी वेदांत झावरे, श्लोक चव्हाण, धार्मिक पटेल, हर्षित पटेल, रोनकजैन, साहिल पोतदार, नचिकेत अजमेरा, मनीष चौधरी, मिहीर पवार, केदारगांगण आदींनी मेहनत घेतली.

# पनवेलमध्ये छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यासमोर दीपोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आनंदाची उधळण करणारा मांगल्यपूर्ण दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यानिमीत्त भारतीय जनता पक्षाचे केदार भगत आणि मित्र परिवाराच्या वतीने पहिला दिवा शिवछत्रपतीच्या चरणापाशी हा उद्दीष्य घेऊन दिपोत्सव २०२३ हा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ११)साजरा करण्यात आला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी नादस्फूर्ती ढोलताशा पथकाने महाराजांना मानवंदना दिली. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेबक ॲड. मनोज भुजबळ, अजय बिहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, नीता माळी, रूचिता लोंढे, प्रितम म्हात्रे आदी उपस्थित होते.

(छाया : संकेत भोईर)





**मुंबई : दिवाळीच्या शुभ मुहुर्तावर अण्णाकोट मंदिरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले तसेच विधिवत पूजा केली. या वेळी भाजप नेते आशिष शेलार, शिवसेना खासदार राहुल शेवाळे आदी उपस्थित होते.**



**उरण : हर्षित रमेश केणी आणि हिमांशू प्रफुल्ल केणी यांनी मोठेभोम येथील मोरया ग्रुपच्या गड किल्ले स्पर्धेत भाग घेऊन मुरूड जंजिरा किल्ल्याची प्रतिकृती साकारली होती. त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.** (छाया : काव्य म्हात्रे)



**पेण : येथील काश्मिरेवाडी येथील दक्ष अंकुश मोकल यांनी दिवाळीनिमित्त पुणे येथील लोहगड किल्ल्याची प्रतिकृती साकारली आहे.**



**नवीन पनवेल : सेक्टर १३ ए टाईपमध्ये श्री समर्थ मित्र मंडळाच्या लहान मुलांनी दिवाळीनिमित्त मुरूड येथील जंजिरा किल्ला साकारला आहे.**

# उरणच्या बाजारपेठेत दिवाळीनिमित्त गर्दी कायम



**उरण : वार्ताहर**

उरण हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे दिवाळीनिमित्ताने येथील बाजारपेठ फुलून गेले आहेत. दुकाने व बाजारपेठांत दिवाळीसाठी लागणाऱ्या वस्तूंनी सजली आहे. कंदील, पणत्या, फटाके, दिव्यांचा झगमगाट सर्वत्र दिसत आहे. यासाठी प्रत्येकाची खरेदीसाठी लगबग सुरू आहे.

दरम्यान, यंदा फटाक्यांच्या किमती २० ते ३० टक्क्यांनी वाढल्या आहेत. उरण शहरात दिवाळीसाठी बाजारपेठा फुलल्या असून खरेदीसाठी नागरिकांची झुंबड उडाली आहे. दिवाळीच्या या दिवाळी सणासाठी ठरण शहर व परिसरातील बाजारपेठ बहरली आहे. झगमगाट करणारे आकाशकंदील, दिवे, पणत्या विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. कागदी, कापडी आणि प्लास्टिकचे दिवाळीनिमित्त बाजारात आलेले साहित्य. कंदील विक्रीसाठी दाखल झाल्याने उरण बाजार पेठ, राजपाल नाका, सेंट मेरी हायस्कूल जवळ, आनंद नगर, बहरला आहे. विविधरंगी सजावट केलेले आकाशकंदील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत, मात्र कंदिलासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या वाढत्या किमतीमुळे १० ते १२ टक्क्यांनी महागले आहेत.

आकाशकंदिलांप्रमाणे चांदणी, बॉल, पॅराशूट, इको फ्रेंडली हॅण्डमेड आकाशकंदील बाजारात पाहायला मिळत आहेत. रांगोळीचे आकर्षक स्टिकर, तयार साचे बाजारपेठेत पाहायला मिळत आहेत. शुभ लाभ, स्वस्तिक श्री, ॐ, लक्ष्मीची पावले, लक्ष्मीचे फोटो, मूर्ती, कुबेर यंत्र, छोट्या-मोठ्या आकारातील झाडू आदी साहित्य नागरिक आवर्जून खरेदी करत आहेत. त्याचप्रमाणे विविध कलर रांगोळी, उपलब्ध असून ठीक -ठिकाणी दुकाने थाटण्यात आली आहेत. हातगाड्या वर मातीच्या पणत्या विकावयास आल्या आहेत, असे व्यापारी यश मेहता यांनी सांगितले.

पेठ सजावटीसाठी कागदी, प्लास्टिक, पीव्हीसी, मेटॅलिक, अक्रेलिकमध्ये फुलांच्या माळा उपलब्ध आहेत. चायना मेड पणत्या पेक्ष्या पारंपारिक मातीच्या पणत्या खरेदी करण्यात नागरिकांचा कल आहे. ४० रुपये ते ५० रुपये डझन अश्या भावाने आम्ही पणत्या विकतो असे पणती विक्रेती पूजा मांडेलकर यांनी सांगितले.

# पाडवा, भाऊबिजेसाठी बाजारपेठेत गर्दी

## कपडे, भांडी, आकर्षक भेटवस्तू खरेदी; कोट्यवधींची उलाढाल

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणात गरीब असो वा श्रीमंत कपड्यांसह भांडी आणि अन्य भेटवस्तूंची खरेदी करताना दिसत आहेत. भाऊबीज व पाडव्यासाठी बाजारातील दुकाने ग्राहकांच्या गर्दीने बहरली आहेत. तरुणाईला नवनवीन आधुनिक फॅशनचे वेड असल्याने ते हटके तयार कपड्याच्या शोधात जिल्ह्यातील विविध दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे दिसते.



दिवाळीच्या हंगामामध्ये जिल्ह्यामध्ये तब्बल ५० कोटी रुपयांहून अधिक रुपयांची उलाढाल होते, असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

दिवाळीत कपडे खरेदीमध्ये महिला, लहान मुले व तरुणांचा उत्साह मोठ्या प्रमाणात असतो. याचाच फायदा घेत जिल्ह्यातील सुमारे अडीच हजार कपड्यांची दुकाने आधुनिक कपड्यांनी सजलेली आहेत. बाजारात नवनवीन कपड्यांच्या डिझाईन्स सातत्याने येत असतात. दिवाळीनिमित्त तयार कपड्यांचे विविध प्रकार पहायला मिळत आहेत. चांगल्या दर्जाची ड्रेस मटेरियल दुकानात उपलब्ध असल्याने ग्राहकांची दुकानांमध्ये गर्दी उसळलेली आहे. तरुणांमध्ये अनेक फॅशनचे कपडे बाजारात आल्याने खासकरून तरुणाईंची दुकानांमध्ये अधिक प्रमाणात गर्दी दिसत आहे. टी-शर्ट, शर्ट, ट्राऊझर, जीन्स दिवाळीमध्ये पहिल्या दिवशी, तसेच भाऊबीज, धनत्रयोदशीसाठी वेगवेगळ्या प्रकारचे कपडे लागत असल्याने हे कपडे खरेदी करण्यासाठी अनेक प्रकारही उपलब्ध आहेत.

जिल्ह्यामध्ये या दिवाळी हंगामात तब्बल ३० कोटी रुपयांची उलाढाल या दुकानांमध्ये होत असते. स्थानिक दुकानदारांबरोबरच ब्रॅण्डेड कंपन्याच्या शोरूममध्येही चांगली वर्दळ दिसत आहे.

### महिलांना खरेदीसाठी पर्वणी

दिवाळीची खरेदी म्हणजे महिलांसाठी पर्वणीच असते. त्यामुळे महिलांचा दुकानांमध्ये वावर वाढलेला आहे. साड्या, विविध प्रकारचे ड्रेस, सलवार सूट, अनारकली, गाऊन, कुर्ती, खासणांसाठी वापरले जाणारे कपडे याला महिलांची विशेष मागणी आहे. प्लाझो, स्कर्ट, फ्रॉक स्टाईल व जॅकेट स्टाईल कुर्ता यामध्येही महिलांसाठी आकर्षक प्रकार बाजारात आले आहेत. विविध भांडी, आकर्षक भेटवस्तू खरेदीसाठी दुकानांमध्ये महिलांची झुंबड उडाली आहे. त्यात पुढील दोन दिवसांत येणाऱ्या पाडवा व भाऊबिज सणासाठी मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात येत आहे.

# पाताळगंगा एमआयडीसीतील रस्ते खड्डेमय

## खड्डे भरण्यासाठी वापरले पेव्हरब्लॉक उखडले

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील पाताळगंगा परिसरात अनेक कारखाने असून या कारखाने वहानांची रेलचेल सातत्याने असल्यामुळे या ठिकाणी कॉंक्रिटीकरण करण्यात आले होते, मात्र काही ठिकाणी खड्डे पडल्यामुळे या ठिकाणी तात्पुरती डागडुजी म्हणून पेव्हरब्लॉक बसविण्यात आले, मात्र वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे पेव्हरब्लॉक विखुरले गेले असून अपघातांची समस्या गंभीर बनत आहे. त्यामुळे या ठिकाणी योग्य रितीने कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी स्थानिकांमधून करण्यात येत आहे.



या मार्गावर मागील तीन आठवड्यामध्ये अपघात होत असून, काहींना गंभीर दुखापत झाली असून काहींना आपले प्राण गमवावे लागले आहे. रस्ता खराब झाला की, याकडे दुर्लक्ष केले जाते. काही वेळा आपली वेळ काढावी यासाठी खड्डे किंवा पेव्हरब्लॉकसारखा वापर करून खड्डे भरले जाते. परिणामी हेच खड्डे अपघातांचे केंद्रबिंदू बनत आहे. पाताळगंगा परिसरात मोठ्या प्रमाणात कारखाने असल्याने येथील रस्त्यावरून कामगारांसह कारखान्यातील अवजड वाहतूकही मोठ्या प्रमाणात सातत्याने होत असते. त्यामुळे खड्ड्यांवर टाकण्यात आलेले पेव्हरब्लॉक विखुरले आहेत.

पाताळगंगा परिसरात सिप्ला कॉर्नर, कैरा कॉर्नरसमोरील रस्त्यांमध्ये फ्लेवर ब्लॉक निघून खड्डे पडले आहेत. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघाताचे प्रमाण जास्त वाढले असून, एमआयडीसी प्रशासन याच्याकडे दुर्लक्ष करीत आहे.

यामुळे वाहनचालकांस जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी ही समस्या अधिक गंभीर बनत आहे.

# पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाच्या परिचारिकेची आत्महत्या

**पोलादपूर : प्रतिनिधी**

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाच्या परिचारिकेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना प्रभातनगर येथील पवार चाळीतील खोलीमध्ये झाली. या घटनेमुळे पोलादपूर शहरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.



पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये परिचारिका पदावर सेवा करणारी ३५ वर्षीय प्रेमलता वामन मेस्त्री हिने प्रभातनगर येथील चाळीतील खोलीमध्ये आतून दरवाजा बंद करून रविवारी सकाळी घराच्या छताला सुती दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक उपनिरिक्षक धुमास्कर आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

रविवारी सकाळी ७ वाजण्याच्या पूर्वी मृत महिलेने गळफास लावून आत्महत्या केली असावी, असा अंदाज असून याबाबत पोलादपूर तालुक्यातील साखर सुतारवाडी येथील या चाळीतील गोविंद गणपत सुतार यांनी खबर दिली आहे. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक माईने यांनी पोलादपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूनुसार नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे. प्राथमिक चौकशीदरम्यान ही महिला परिचारिका मानसोपचार तज्ज्ञांमार्फत उपचार घेत असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली असून या घटनेमुळे पोलादपूर शहरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# पोलिसांची बेदरकार चालकांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर रविवारी (दि. १२) वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिह्यात सध्या दिवाळीचा उत्साह सर्वत्र पसरला आहे. लक्ष्मीपूजनाचा दिवशी अनेक जण आपली वाहने घेऊन बाहेर पडतात, मात्र अशा वेळी अनेक तरुण- तरुणी उत्साहाच्या भरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहने चालवितात, तर काही मद्यपान करून वाहने चालवितात. अशा १३७ चालकांवर वाहतूक पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून ८२ हजार २०० रुपये इतका दंड आकारला आहे.

# पालीत गणेशभक्तांना घेतली १०८ रुग्णवाहिकेची माहिती

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका आरोग्य विभागातर्फे अत्यावश्यक १०८ या रुग्णवाहिकेची माहिती बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या गणेशभक्तांना देऊन जनजागृती करण्यात आली.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी व जिल्हा समन्वक जीवन काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी १०८ रुग्णवाहिकेचे महत्त्व, तिची उपयुक्तता तसेच १०८ रुग्णवाहिकेची सेवा कशी मिळते आदींबाबत माहिती देण्यात आली. आवश्यकता असेल तेव्हा १०८ रुग्णवाहिकेला संपर्क करून मोफत सेवा घेऊन रुग्णांचे प्राण वाचवावे असे आवाहन करण्यात आले.

जिल्हा उपगट समन्यवयक कांचन बिडवे, डॉ. नंदकुमार मूळे डॉ. इलियास मोबिन व १०८चे चालक ज्ञानेश्वर जगताप उपस्थित होते.






**मुरूड : शहरातील बाजारपेठेतील मुलांनी प्रतापगड किल्ला बनवला आहे. तुषार, भाग्यश्री, जय करडे यांनी किल्ला साकारण्यासाठी मेहनत घेतली.** (छाया : संजय करडे)

# रोह्यात सुराज्यतर्फे दिवाळी पहाट व दिवाळी संध्या कार्यक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने दिवाळी पहाट व दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि. ११) डॉ. सी. डी. देशमुख कन्याशाळा येथे केले होते. स्पंदन नाट्य संस्था प्रस्तुत स्वरगंध हा कार्यक्रम तसेच पारंपरिक वेशभूषा, चित्रकला स्पर्धा झाली व विजेत्यांना बक्षीस देण्यात आले.



कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, ओम ज्वेलर्स, विनोद पाशीलकर, उद्योजक रईस कादरी, व्यावसायिक लियाकत हाफिज, अमित घाग यांचे विशेष सहकार्य लाभले. या वेळी संस्थेच्या अध्यक्ष स्नेहा आंबरे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे किसन घाग, माजी नगरसेवक मयूर दिवेकर, महेंद्र गुजर, सकल मराठा समाज अध्यक्ष प्रदिप देशमुख आदी उपस्थित होते. स्फूर्ती प्रतिष्ठानच्या वतीने या वेळी ढोलपथक सादर करण्यात आले.

सामाजिक क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या भूतकर ताई, छाया बर्गे, अरुंधती पेंडसे, संगिता पाशीलकर, जयश्री भांड, दर्शना आठवले, कविता साळुंके, स्वाती शेळके यांच्यासह इतर महिला व नियोजित सोसायटी अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे परीक्षण कलर्स मराठी ढोलकीच्या तालावर फेम सोनाली पवार, डान्स कोरीओग्राफर जयेश पाटील, डान्सर पवन गावंड यांनी केले.

दिवाळी संध्या कार्यक्रमास माजी भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, जिल्हा युवा वारिअर्स अध्यक्ष संकेत नाकरेकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस सुरेशजी मगर, पत्रकार संतोष सातपुते, पत्रकार सागर जैन, पत्रकार जितेंद्र जाधव, सुरेंद्र निंबाळकर, युवा उद्योजक राम नाकाती यांनी उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला अध्यक्ष प्रिया जंगम यांनी केले, तर सुराज्यचे संस्थापक रोशन चाफेकर, अध्यक्ष किरण कानडे, उपाध्यक्ष विनीत वाकडे, सचिव हाजी कोठारी यांच्यासह सर्व सुराज्य पदाधिकारी व सदस्यांनी नियोजन केले होते.

# खोपोलीत मनोरुग्णाचे अभ्यंगस्नान करून 'सहजसेवे'ने साजरी केली दिवाळी

**खोपोली : प्रतिनिधी**

सहज सेवा फाउंडेशनने खोपोलीत २०१६पासून मनोरुग्ण स्वच्छता उपक्रम हाती घेतला होता. खोपोलीत दळणवळण साठी येणाऱ्या विवीध मार्गाने अनेक मनोरुग्ण दाखल होत असतात, परंतु सहज सेवा फाऊंडेशनने राबविलेल्या मनोरुग्ण स्वच्छता मोहीममुळे अनेकांना आपले हरवलेले कुटुंबीय परत मिळण्यास मदतदेखील झालेली आहे.



समाजातील अनाथ घटकांना सेवा देणे हे संस्थेचे मोठे कार्य असून याच कार्याच्या जाणिवेतून दरवर्षी दिवाळीच्या पहिल्या दिवशी खोपोलीतील स्थानिक रहिवासी असलेले परंतु दुर्दैवाने मनोरुग्ण ठरलेले भरत जाधव यांना अभ्यंगस्नान देवून दिवाळी साजरी केली जाते. रविवारी गगनगिरी आश्रमाजवळील पाताळगंगा नदीकिनाऱ्यावर गरम पाण्याने अंघोळ घालून दिवाळी साजरी करण्यात आली. यानिमित्त भरत यांना फराळ देण्यात आला. दिवाळीच्या पहाटे ही स्वच्छता मोहीम पाचव्या वर्षी राबविण्यात आली.

या वेळी धनराज जंबगी, बंटी कांबळे, दुर्गेश देवकर, मोईन खान, संतोष गायकर, अजय कांबळे यांनी सहकार्य केले. या उपक्रमासाठी सहज सेवा फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्ष माधुरी गुजराथी, उपाध्यक्ष इशिका शेलार, सचिव अखिलेश पाटील, खजिनदार संतोष गायकर, महिला संघटक निलम पाटील, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, खालापूर तालुका प्रमुख मोहन केदार, मार्गदर्शक राजेंद्र फक्के, सल्लागार नरेंद्र हर्डीकर यांनी नियोजनासाठी परिश्रम घेतले.

# निजामपुरात दिवाळी पहाटची सुरेल मैफिल रंगली





**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील निजामपूर विभाग सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व बाबुशेठ खानविलकर मित्रमंडळाच्या वतीने रविवारी (दि. १२)दिवाळी पहाट कार्यक्रमाची सुरेल मैफिल रंगली. कार्यक्रमात मंदार महामुणकर निर्मित सुनीला इव्हेंट्स प्रस्तुत स्वरस्पर्श एक स्वरमयी कार्यक्रमातील कलाकारांनी भक्तीगीत, भावगीत, कोळीगीत, लोकगीत, जुनी गाणी, कव्वाली, लावणी असे कलाविष्कार सादर केले.


या दिवाळी पहाट कार्यक्रमाचा आमदार अनिकेत तटकरे यांच्यासह रसिकांनी मनमुराद आनंद लुटला.

या वेळी निजामपूर विभागातील सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, व्यावसाय आदी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा, विद्यार्थ्यांचा विशेष गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी महाड विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष बाबुशेठ खानविलकर, पं. स. माजी उपसभापती तुकाराम सुतार, निजामपूर विभाग राष्ट्रवादीचे अध्यक्ष संदीप जाधव,निजामपूर शहर राष्ट्रवादीचे अध्यक्ष महेश शिर्के, सागर खानविलकर, भाले ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच दत्ताराम खांबे, रवींद्र चांगण, सेवा निवृत्त शिक्षक संजय निजापकर, सौरभ तटकरे, दिगंबर खुंटेकर, देवेंद्र कोलवणकर, शिवशंभू मित्रमंडळ, संजोग मानकर, प्रदीप कदम, प्रवीण गोरे, बबन मोहिते, महेश कोंडेकर, गणेश बामुगडे, शुभम धुपकर, अहंमद जालगावकर यांच्यासह रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लहान मुलांची फटाक्यांना पसंती

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवाळी सणांस प्रारंभ झाला असून यामध्ये गोडधोडसमवेत फटाक्यांची यादी मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत आहे. गरीब असो अथवा श्रीमंत प्रत्येक जण दिवाळी साजरी करीत असतो. यामुळे फटाक्यांचे महत्त्व कमी होत नसल्यांचे दिसून येत आहे. बाजारपेठ असो अथवा ग्रामीण भागातील दुकाने फटक्यांनी सज्य झाल्या आहेत.



लहान मुलांना आकर्षित करण्यासाठी बाजारपेठेत फटाक्यांचे विविध प्रकार दाखल झाले आहे. प्रत्येक मुलांच्या आवडी नुसार प्रत्येक पालक वर्ग फटाके खरेदी करीत आहेत.

दिवाळीचा हा मांगल्याचा उत्सव फक्त दिव्यांच्या लखलखाटांनी आणि शुभेच्छांनीच साजरा करण्यासाठी असल्यामुळे हा उत्सव असलेली दिवाळी हा सण सुरू झाल्यामुळे दिवाळीसाठी आवश्यक असलेल्या कपडे, मिठाई, दिवे व इतर पूजासाहित्याची खरेदी करण्यात येत आहे, परंतु या शॉपिंग लिस्टमध्ये फटाक्यांचा समावेशही मोठ्या प्रमाणात असल्याचे पहावयास मिळत आहे.

# शेतकरी उत्पादक कंपनीकडून ऑईल मिलचे उद्घाटन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा शेतकरी उत्पादक कंपनीतर्फे नुकतेच ऑईल मिलचे उद्घाटन तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांच्यामार्फत करण्यात आले. ऑईल मिल ही नांदगाव भागात असून सर्व प्रकारच्या तेलबिया तसेच शेगंदाणा व सुके खोबरे आदी प्रकारचे तेल निघणार आहे.



उद्घाटनसाठी शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष श्रीधर जंजीरकर, संचालक मधुकर कोळी, दिलीप विरकुड, अनिल नाक्ती, रचना कवळे, मुख्य कार्यकारी अधिकारी ऋतुजा चौलकर, चिराग दावरे, पर्भाकर गाणार, सरिता कोतवाल आदी उपस्थित होते. सर्व सभासदांना एक किलोसाठी ४० रुपये आकारण्यात येणार आहे, तर इतरांना ६० रुपये लागणार आहेत. या वेळी अध्यक्ष श्रीधर जंजीरकर यांनी सांगितले की, मुरुड तालुक्यात नारळाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सुके नारळ पडून राहतात. अशा वेळी या नारळाचे काय करावे, असा प्रश्न शेतकऱ्यांना होता, परंतु आता ऑईल मिल झाल्याने अशा सुक्या नारळापासून तेल काढता येणार आहे. हे शुद्ध खोबरेल तेल शेतकरी कंपनीला विकू शकतात. त्यामधून त्याना आर्थिक फायदाही मिळणार आहे. यासाठी या ऑईल मिलचा फायदा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# भारताने रचला इतिहास!

## विश्वचषकात सलग नवव्या विजयाची नोंद

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील शेवटच्या साखळी सामन्यात भारतीय संघाने नेदरलँड्सचा १६० धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने गट फेरीतील आपले सर्व सामने जिंकले. त्यांनी सर्व नऊ प्रतिस्पर्ध्यांचा पराभव इतिहास रचला आहे.

बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. टीम इंडियाने ५० षटकांत चार विकेट गमावत ४१० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात नेदरलँड्सचा संघ ४७.४ षटकांत सर्वबाद २५० धावांवर आटोपला. भारताने दिवाळीच्या दिवशी चाहत्यांना विजयाची भेट दिली. श्रेयस अय्यर आणि के. एल राहुल यांनी या सामन्यात वादळी फलंदाजी करताना वनडे विश्वचषक कारकीर्दीतील पहिले शतक झळकावले.



प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने चार गडी गमावून ४१० धावांचा डोंगर उभारला होता. श्रेयस अय्यरने सर्वाधिक नाबाद १२८ धावा केल्या. त्याला लोकेश राहुलने १०२ धावांची खेळी करत उत्तम साथ दिली. कर्णधार रोहितने ६१ धावांची आक्रमक खेळी करत संघाला चांगली करून दिली. शुबमन गिल आणि विराट कोहलीने प्रत्येकी ५१ धावांचे योगदान दिले.

नेदरलँड्सकडून जस्ट-डी-लीडेने दोन विकेट्स घेतल्या. मीकरेन आणि मर्व्ह यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. या सामन्यात भारताच्या पहिल्या पाच फलंदाजांनी ५०हून अधिक धावा करीत एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. लोकेश राहुल आणि श्रेयस अय्यर यांनी चौथ्या विकेटसाठी २०८ धावांची भक्कम भागीदारी केली. प्रत्युत्तरात नेदरलँड्सचा संघ ४७.४ षटकांत सर्वबाद २५० धावांवर आटोपला.

### राहुलने केले वेगवान शतक

विश्वचषक स्पर्धेत भारताने नेदरलँड्सचा धुव्वा उडवला. या सामन्यात केएल राहुलने ६२ चेंडूत शतक झळकावले, जे भारताकडून विश्वचषकातील सर्वांत वेगवान शतक आहे. राहुलने रोहित शर्माचा विक्रम मोडला. रोहितने याच विश्वचषकात अफगाणिस्तानविरुद्ध ६३ चेंडूत शतक झळकावले होते. राहुलने श्रेयस अय्यरबरोबर चौथ्या विकेटसाठी १२८ चेंडूत २०८ धावांची भागीदारी केली. त्याने ६४ चेंडूत ११ चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने १०२ धावा केल्या.

# विराटचे गोलंदाजीतही योगदान

## नऊ वर्षांनंतर घेतली वनडेत विकेट

**मुंबई : प्रतिनिधी**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने विश्वचषक स्पर्धेत विजयी मालिका सुरू ठेवली आणि सलग नववा विजय मिळवला. या सामन्यात विराट कोहलीने फलंदाजीबरोबर गोलंदाजीतही योगदान दिले. त्याचबरोबर विराटने नऊ वर्षानंतर वनडे क्रिकेटमध्ये विकेट घेतली.



नेदरलँड्सच्या डावातील २३व्या षटकात कोहली गोलंदाजी करायला आला होता. विराटने त्याच्या स्पेलच्या दुसऱ्याच षटकात त्याने विरोधी संघाचा कर्णधार चार्ल्स एडवर्डसला झेलबाद केले. एडवर्डसचा यष्टीच्या मागे शानदार झेल घेतला.

या विश्वचषकात कोहली दुसऱ्यांदा गोलंदाजी करताना दिसला. यापूर्वी त्याने बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात गोलंदाजी केली होती. त्या सामन्यात त्याने फक्त तीन चेंडू टाकले आणि हार्दिकचे षटक पूर्ण केले होते.

या सामन्यात विराट कोहलीने आपला स्पेल पूर्ण केला. त्याने पहिल्याच षटकात सात धावा दिल्या, पण शेवटच्या चेंडूवर चौकार आला होता. स्लिप असती तर विराटला विकेट मिळाली असती, मात्र पुढच्याच षटकात कोहलीने त्याची भरपाई केली आणि षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर विकेटही घेतली. त्याची वनडे कारकिर्दीतील ही पाचवी विकेट होती. या अगोदर विराट कोहलीने नऊ वर्षांपूर्वी न्यूझीलंडविरुद्ध विकेट घेतली होती. त्याने ३१ जानेवारी २०१४ रोजी ब्रेंडन मॅक्युलमला बाद केले होते.

# रेवदंडा येथील कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ



**रेवदंडा : प्रतिनिधी**

दिपवालीच्या लक्ष्मीपूजनानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडळ, रेवदंडा-चौल आयोजित कुस्ती स्पर्धेचा प्रारंभ मोठ्या उत्साहात झाला.

कुस्तीगीर संघटनेचे अलिबाग तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत यांच्या हस्ते व मैदानाचा शुभारंभ मंडळाचे अध्यक्ष सुरेश खोत यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. या वेळी श्री छत्रपती शिवाजी मंडळाचे माजी अध्यक्ष हेमंत जनार्दन गणपत, खजिनदार शरद वरसोलकर, मधुकर फुंडे, संदिप खोत, वाडगावचे माजी उपसरपंच चंद्रकांत थळे, नितिन ठाकूर, बाळाशेठ गुरव, विजय आढाव, राहूल हेमंत गणपत आदी उपस्थित होते. या कुस्ती स्पर्धेत परिसरातील आखाड्यांनी सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेत वासुदेव पाटील, सुधाकर पाटील, मिलिंद भगत, संदिप मोरे हे पंच तर टाईम किपरची भूमिका बाळा गुरव व कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व समालोचन राजेंद्र नाईक यांनी जबाबदारी स्विकारली आहे.

स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास चषक तसेच प्रत्येक कुस्तीस बक्षिसे देण्यात येणार आहेत. या कुस्ती स्पर्धेत मुलींच्या कुस्तीचासुद्धा सहभाग आहे.

# सूर्यकुमार यादवला क्षेत्ररक्षणाचे पदक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

२०२३या विश्वचषकाच्या पहिल्या सामन्यापासून भारतीय संघाने एक विशेष उपक्रम सुरू केला आहे. सामन्यानंतर प्रशिक्षक सर्वोत्तम क्षेत्ररक्षण केल्याबद्दल खेळाडूची निवड करतात आणि त्याला पदक देतात. या सामन्यात सूर्यकुमार यादवला हे पदक जिंकण्यात यश मिळाले.

प्रथम अष्टपैलू रवींद्र जडेजाचे नाव घेतले गेले, नंतर फलंदाज सूर्यकुमार यादव आणि नंतर विकेटच्या मागे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या केएल राहुलची सर्वोतम स्पर्धक म्हणून निवड करण्यात आली. त्यातून सूर्यकुमार यादवने बाजी मारत हे पदक पटकावले.

# माजी पाकिस्तानी क्रिकेटपटूंकडून केएल राहुलचे तोंडभरून कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

पाकिस्तानचा माजी कर्णधार वसीम अक्रम, माजी क्रिकेटपटू मिसबाह-उल-हक आणि शोएब मलिक या तिघांनीही केएल राहुलच्या शतकाचे कौतुक केले आहे. राहुलने नेदरलँड्सविरोधात खेळताना ६२ चेंडूंमध्ये १०० धावा केल्या. त्याच्या या खेळीचे वसीम अक्रमने खास शब्दात कौतुक केले आहे. एकवेळ ग्लेन मॅक्सवेलविरोधात गोलंदाजी करणे सोपे आहे, पण राहुलच्या विरोधात नाही, असे अक्रम म्हणाला.



केएल राहुलला कुठल्याही गोलंदाजीचा सामना कसा करायचा, याचे टेक्निक समजले आहे. त्याची कामगिरी ही बेस्ट असते हे त्याने दाखवून दिले आहे, असे अक्रमने सांगितले.

केएल राहुलचे कौतुक करताना शोएब मलिक म्हणाला, राहुल हा एक उत्तम फलंदाज आहे तरीही भारतीय संघाने त्याला चौथ्या क्रमांकावर बॅटिंग देण्याचा पर्याय ठेवला आहे, कारण त्याला टेक्निक कळले आहे. समजा भारतीय संघाच्या विकेट्स लवकर गेल्या तर चौथ्या क्रमांकावर येऊन राहुल हा किल्ला लढवू शकतो. याचसाठी त्याला हे स्थान दिले गेले आहे.

केएल राहुलचे वैशिष्ट्य हे आहे की तो उत्तम खेळी करुन सामना जिंकवून देऊ शकतो. त्याच्यासमोर फिरकीपटू आले काय किंवा जलद गतीने गोलंदाजी करणारे गोलंदाज आले काय प्रत्येक चेंडूचा सामना उत्तम प्रकारे कसा करायचा हे तो त्याच्या सरावाने शिकला आहे. ऑस्ट्रेलियाविरोधात त्याने सामना कसा जिंकवून दिला हे आम्ही पाहिले आहे, असेही मलिक म्हणाला.

यानंतर मिसबाह उल हकनेही केएल राहुलच्या खेळीचे कौतुक केले आहे. यॉर्कर चेंडू असो किंवा फिरकी चेंडू असो त्याचा सामना राहुल ज्या शिताफीने करतो त्याला जवाब नाही. अशा फलंदाजांसमोर गोलंदाजी करणे हे कायमच आव्हानात्मक असते त्यामुळेच राहुलसारख्या फलंदाजासमोर गोलंदाजी करणे कठीण होते, असे म्हणत मिसबाहने त्याचे कौतुक केले आहे.

# आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये सेहवाग आणि डायना एडुजी यांचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या इतिहासातील तीन महान खेळाडूंचा समावेश आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये करण्यात आला आहे. यामध्ये भारताचा सलामीवीर वीरेंद्र सेहवाग, माजी भारतीय महिला कसोटी कर्णधार डायना एडुजी आणि श्रीलंकेचा माजी फलंदाज अरविंदा डी सिल्वा यांचा समावेश आहे.





आधुनिक क्रिकेटच्या आक्रमक फलंदाजी करणाऱ्या सलामीवीरांमध्ये गणला जाणाऱ्या सेहवागने कसोटीत त्रिशतक झळकावणारा तो पहिला भारतीय खेळाडू आहे. त्याने कसोटीत दोनदा त्रिशतक ठोकले, तर २३ कसोटी शतके झळकावली.

डायना एडुजी यांनी जवळपास तीन दशके भारतीय महिला संघाचे नेतृत्व केले. डावखुऱ्या ऑर्थोडॉक्स फिरकी गोलंदाज म्हणून ५४ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एकूण १०९ विकेट्स घेतल्या आहेत. एडुजींनी पश्चिम रेल्वेमध्ये प्रशासकाची भूमिका स्वीकारली आणि महिला क्रिकेटपटूंसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले.

# क्रिकेटचे मैदान सोडून धोनी उतरला टेनिस कोर्टात; व्हिडीओ व्हायरल

**रांची : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केल्यानंतर देखील क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी चर्चेत असतो. आता भारताचा माजी कर्णधार धोनी टेनिस कोर्टवर आहे. व्हिडिओमध्ये धोनी हाफ टी-शर्टमध्ये टेनिस खेळताना दिसत आहे. क्रिकेटमध्ये चौकार, षटकार लगावणारा धोनी टेनिसच्या कोर्टवरदेखील आरामात खेळताना व्हिडिओमध्ये दिसत आहे. सोशल मीडियामध्ये व्हायरल होत असलेल्या या व्हिडीओवर चाहत्यांकडून लाईक्स आणि कमेंट्सचा पाऊस पडताना दिसत आहे.




अलीकडेच व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये धोनीने आयपीएलचा पुढचा सीझन खेळण्याबाबत मोठी हिंट दिली होती. धोनीबाबत असे म्हटले जात होते की, त्याने केवळ आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे, आयपीएलमधून नाही. यावरून माही आयपीएल खेळणे जवळपास निश्चित असल्याचे मानले जात आहे. याशिवाय माहीने त्याच्या गुडघ्याबाबत अपडेटही दिली होती.

धोनीचा टेनिस खेळतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत पहायला मिळाला. आयपीएलच्या पुढच्या सीझनमध्ये धोनीच्या चेन्नई सुपर किंग्जकडून खेळताना दिसणार असल्याची चर्चा आहे. यादरम्यान माही टेनिस कोर्टवर आपल्या कूल साइलमध्ये पाहायला मिळाला.

# ...म्हणून विराट, गिलला देण्यात आली गोलंदाजी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर रविवारी नेदरलँड्सविरुद्धच्या लीग सामन्याचा फायदा घेत विराट कोहली आणि कर्णधार रोहित शर्मा, शुबमन गिलच्या हातीसुद्धा गोलंदाजीची जबाबदारी देण्यात आली होती. याविषयी कर्णधार रोहित शर्माने स्पष्टीकरण दिले आहे.



हार्दिक पांड्याच्या दुखापतीमुळे भारताचा समतोल बिघडला होता. भारताने हार्दिकची जागा भरून काढताना प्लॅन बीनुसार, सूर्यकुमार यादवला स्पेशालिस्ट फलंदाजीचा पर्याय म्हणून सहाव्या क्रमांकावर आणले, तर शार्दुल ठाकूरला मोहम्मद शमीच्या जागी स्पेशालिस्ट वेगवान गोलंदाजीचा पर्याय म्हणून आणण्यात आले. या योजनेनुसार भारताने स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला. रविवारी भारताने नेदरलँड्सला ४११ धावांचे बलाढ्य आव्हान दिले होते, काही प्रमाणात यामुळे भारताचा विजय सुनिश्चितच होता म्हणून आपल्याकडील फलंदाजांची गोलंदाजीत क्षमता तपासण्यासाठी हा प्रयोग करण्याचे ठरवण्यात आले होते.

चुकीच्या पायाने इनस्विंगचा धोका असलेल्या विराट कोहलीने सहा वर्षांत प्रथमच एका ओडीआय सामन्यात पूर्ण षटक टाकले आणि नेदरलँड्सचा कर्णधार स्कॉट एडवर्ड्सची एक विकेटही घेतली. तीन षटकांमध्ये १३ धावांत एक विकेट घेऊन विराट कोहलीने सर्वांना थक्क केले. त्यानंतर शुभमन गिलला नंतर बोलावण्यात आले गिलनेसुद्धा ऑफ-स्पिन गोलंदाजीने दोन षटकांत ११ धावा दिल्या. त्यापाठोपाठ देशांतर्गत क्रिकेटमध्ये ३६ विकेट्स घेणारा सूर्यकुमार यादवसुद्धा मैदानात आला. उजव्या हाताच्या ऑफ ब्रेक गोलंदाजाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रथमच दोन षटकांत १७ धावा दिल्या. अखेरीस, रोहितनेच ११ वर्षांतील पहिला एकदिवसीय विकेट घेऊन जगाला भारताच्या अष्टपैलूत्वाची झलक दाखवून दिली.

शेवटी रोहित शर्माने भारताच्या या प्लॅनविषयी सांगितले की. आमच्याकडे नऊ (गोलंदाजी) पर्याय होते, हे महत्त्वाचे आहे, हा असा खेळ होता जिथे आम्ही काही गोष्टी करून पाहू शकलो असतो. वेगवान गोलंदाज गरज नसताना वाइड यॉर्कर टाकतात. गोलंदाजी युनिट म्हणून, काहीतरी वेगळे करण्याचा प्रयत्न करायचा होता आणि आम्ही काय साध्य करू शकतो ते पाहायचे होते.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com